**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

जा.क्र.अम / सका - ०३ / २०१४.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : २६ / ०८ /२०१४.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सुचना

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०३ , बुधवार दिनांक ०३ / ०९ /२०१४.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती............................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

यांस.-

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र. १ ( अ ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा **बुधवार दिनांक ०३ / ०९ / २०१४ रोजी दुपारी १.३० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक ०३ बुधवार दिनांक ०३ / ०९ / २०१४ रोजी दुपारी १.३० वाजता होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| **विषय क्र.** | **विषय** |
|---|---|
| ११ | नगररचना योजना क्र.४ मधील अंतिम भुखंड क्रमांक २६२, गंगा उद्यान येथील गाळयांचे निविदा पध्दतीने वाटप करणें बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १२ | अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील शुभमंगल कार्यालय, सावेडी ते प्रेमदान हडको दत्त मंदिर पर्यंतच्या रस्त्यास **"स्वामी विवेकानंद मार्ग"** असे नांव देण्याबाबत श्री.संजय विठ्ठलराव घुले यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| १३ | नालेगांव स.नं.२२०,२२१ येथील मनपा तर्फे सुरु असलेल्या ३३२ घरांच्या वसाहतीला "डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर" नाव देणेबाबत त्याप्रमाणे नालेगांव स.नं.४१/२ येथील एकुण घरे ३७२ घरकुल योजनेला "महात्मा ज्योतीबा फुलेनगर " असे नामकरण करणे बाबत श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारुती बोराटे व श्री.विजय नाना गव्हाळे यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| १४ | नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत पुरवणी मागणीव्दारे मंजूर केलेले अतिरिक्त अनुदान वितरीत करण्याबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १५ | बुरुडगांव गावातील ग्रामस्थांचा पिण्याचा पाण्याच्या प्रश्नाबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १६ | बुरुडगांव थकीत पाणीपट्टी दुरुस्ती करणे व पाणीपट्टी कमी करणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १७ | अहमदनगर महानगरपालिका बुरुडगांव स.नं.३४ (पैकी) येथील कचरा डेपोच्या जागे संदर्भात मा.NATIONAL GREEN TRIBUNAL, WESTERN ZONE BENCH, PUNE येथे APPLICATION NO.९ (THC)/२०१३ (WZ)चे अंतरीम आदेश बाबत निर्णय घेणेस्तव प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| १८ | अहमदनगर महानगरपालिका कर्मचा-यांचे वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक अदायगी बाबत प्राप्त झालेले कार्यालयीन प्रस्ताव अनुक्रमे **१)** श्री.सुरेश कोंडीबा इथापे, ड्राप्समन, व श्री.मुकेश हळनोर, **२)** श्री.एजाज शेख व श्री.अशोक गुलदगड, **३)** श्री.गोपीनाथ धोंडीराम अडागळे, **४)** श्री.किशोर कमलाकर देशमुख, स्वच्छता निरीक्षक यांच्या प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |

| | |
|---|---|
| १९ | अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना दिवाळी सणानिमित्त सानुग्रह अनुदाना बाबत झालेल्या करारनाम्यास व त्याप्रमाणे प्रत्येकी रु.५,०००/- इतका सानुग्रह अनुदान दिलेल्या खर्चास कार्योत्तर मंजूरी मिळणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे. |
| २० | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : २६ / ०८ /२०१४.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : ११** **दिनांक : ०३ / ०९ /२०१४.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** नगररचना योजना क्र.४ मधील अंतिम भुखंड क्रमांक २६२, गंगा उद्यान येथील गाळयांचे निविदा पध्दतीने वाटप करणें बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंतीपुर्वक रिपोर्ट देण्यांत येतो की, नगररचना योजना क्रमांक ४ मधील अंतिम भुखंड क्रमांक २६२, गंगाउद्यान जवळील गाळयांचे दरमहा भाडे, अनामत रक्कम ठरविणेबाबत मा.नगररचनाकार यांना जा.क्र.मार्केट ५८ दिनांक ०९/०५/२०१३, २५३ दिनांक २८/०१/२०१४ अन्वये कळविले होते.

सदर ठिकाणी एकूण १५ गाळे बांधलेले आहे. प्रत्येकी गाळयांचे क्षेत्रफळ ३x३ चौरस मीटर आहे. प्रत्येकी गाळयांस दरमहा भाडे रुपये १६००/- व अनामत रक्कम रु.२००००/- इतकी आकारण्यांत यावी. सदरचे भाडे हे मालमत्ता कर विरहीत असुन लाईट बील, घरपट्टी, शासनाचे कर गाळेधारकांस स्वतः भरावे लागेल असे दरमहा भाडे अनामत रक्कम मा.नगररचनाकार यांनी दिनांक ३१/०१/२०१४ रोजी प्रमाणित केलेले आहे. सदर गाळे भाडयाने देणेबाबत मार्केट विभागाने कार्यवाही करावी असे मा.शहरअभियंता म.न.पा. यांनी इकडेस दि.२१/२/१४ रोजी कळविले आहे. मा.नगररचनाकार यांनी प्रमाणित केलेले दरमहा भाडे, अनामत रक्कम या भाडेमुल्यांकनाच्या प्रस्तावास मा.आयुक्त यांनी दि.३/३/२०१३ रोजी मान्यता दिलेली आहे. सदरचा प्रस्ताव इकडेस दि.५/३/२०१४ रोजी प्राप्त झालेला आहे.

मा.शासनाच्या परिपत्रक व मार्गदर्शक सुचनेनुसार खालील प्रमाणे गाळे आरक्षित ठेवणे आवश्यक आहे.

| अ.क्र. | परिपत्रक क्रं. व किती टक्के आरक्षण | कोणत्या जाती जमाती करीता व संस्थेकरीता आरक्षण | आरक्षित गाळा क्रं. |
|---|---|---|---|
| १ | न.पा.प्रशासन संचालनालय मुंबई पत्र क्रं.एम.सी.ए. ३१८६/सी.आर.-१४४-८६२ दिनांक २८ मे ८६ अन्वये व दिनांक२१/१०/८१ नुसार ५% | अनुसुचित जाती-जमाती विमुक्त व भटक्या जमाती करीता एकुण १५ गाळयांपैकी १ गाळा आरक्षित करणे योग्य होईल. | १ |
| २ | मा.उपसचिव नवि महाराष्ट्र शासन पत्र क्र.जी.ई. एन.१०८४/२७३५/सी.आर./२२५/८४ दि.१३/३/१९८५ नुसार किमान१ गाळा आरक्षित ठेवावा | ग्राहक भांडार स्थापने करीता एकुण १५ गाळयां पैकी १ गाळा आरक्षित करणे योग्य होईल. | २ |
| ३ | मा.डॉ.जयंतराव पाटील चेअरमन महाराष्ट्र खादी व ग्रामोद्योग मंडळ पत्र क्र.आय.एन.डी.२/२१३६५ दि.२२/२/८९ अन्वये १ गाळा आरक्षित ठेवावा. | खादी ग्रामोद्योग मंडळा करीता एकुण १५ गाळयां पैकी १ गाळा आरक्षित करणे योग्य होईल. | ३ |
| ४ | महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग निर्णय क्रं.टी.पी. एस.३६९२/१७३२/न.वि.११ दि २०/६/९४ नुसार फलोत्पादन करीता १०% | फलोत्पादन संस्थेला एकुण १५ गाळयापैकी १ गाळा आरक्षित करणे योग्य होईल. | ४ |

| | | | |
|---|---|---|---|
| ५ | महाराष्ट्र शासन निर्णय क्रं.१०९८/मंत्रालय, मुंबई ३२ दि.२६ एप्रिल २००१ व मा.आयुक्त साहेब म.न.पा. यांचे दि.६/१०/२००३ चे आदेशानुसार अंध व अपंगासाठी एक गाळा आरक्षित करणे योग्य होईल. | अंध व अपंगासाठी एकूण १५ गाळयापैकी १ एक गाळा आरक्षित करणे योग्य होईल. | ५ |
| ६ | महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक - रो.स्व.रो.२००२/प्र.क्र./२६७/रोस्वरो/१ दि.१७ ऑगस्ट २००२ | बेरोजगार सेवा सहकारी संस्थेसाठी १५ गाळयांपैकी १ गाळा आरक्षित करणे योग्य होईल. | ६ |
| ७ | नगरपरिषद प्रशासन संचालनालय परिपत्रक क्र.नपप्रस/८२/म.ग.व्य.जा./२००४/प्र.क्र.१०८७ दि.२३ ऑगस्ट २००६ | महिला बचत गटासाठी १५ गाळयांपैकी १ गाळा आरक्षित करणे योग्य होईल. | ७ |
| ८ | मा.जिल्हा सैनिक अधिकारी यांचे कडील पत्र क्र.२१०५/जिसैकका/६ दिनांक १० मार्च २०१४ चे पत्रानुसार | माजी सैनिकासाठी १५ गाळयापैकी १ गाळा आरक्षित करणे योग्य होईल. | ८ |

१) सदर गाळे ३० वर्ष कराराने देणे.

२) दरमहा भाडयात दरवर्षी ३% भाडेवाढ करणे.

३) जो निविदाधारक निविदा स्पर्धेत जास्तीत जास्त दरमहा भाडे देणेचे निविदा अर्जात नमुद करेल त्याची निविदा मंजूर करावी. मा.नगररचनाकार यांनी जी अनामत रक्कम प्रमाणित केली आहे ती घेणे.

४) दरमहा भाडयाव्यतिरिक्त लाईट बिल, मा.शासनाचे, म.न.पा.चे सर्व कर, गाळाधारकांस स्वतः भरावे लागतील.

५) मंजुर गाळाधारकांस स्वखर्चाने मा.दुय्यम निबंधक, अ.नगर यांचेकडेस करारनामा करुन द्यावा लागेत.

६) नवीन निविदा अर्ज छापुन देणेबाबत रेकॉर्ड विभागास आदेश होणेस तो निविदा अर्ज निविदा धारकास प्रत्येकी रु.५००/- (अक्षरी रु.पाचशे फक्त) विक्रीकरीता ठेवणे.(ना-परतावा)

७) बयाणा रक्कम - अ - सर्वसाधारण नागरिकांसाठी रु.१०,०००/- (अक्षरी रु.दहा हजार फक्त) - ब - अनुसुचित जाती-जमाती विमुक्त व भटक्या जमाती, मागासवर्गीयासाठी, अंध व अपंगासाठी रु.५,०००/- (अक्षरी रु.पाच हजार फक्त) - क - बेरोजगाराच्या सेवा सहकारी संस्थेला परिपत्रकानुसार निविदा अर्ज देतांना बयाणा रक्कम भरणे बाबत सूट देण्यात यावी.

८) आरक्षीत गाळयासाठी दोन वेळेस निविदा मागणी करुन सुध्दा जर निविदा प्राप्त झाल्या नाही तर ते आरक्षित गाळे सर्वसाधारण गटासाठी ठेवुन फेरनिविदा मागविण्यास मंजुरी मिळावी.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४८ मधील कलम ७९ अन्वये या दरमहा भाडे अनामत रक्कम मुल्यास्तव गाळे निविदा पध्दतीने वाटपबाबतचे धोरण ठरविणेसाठी मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे व प्रस्तावातील मुद्दा क्र.१ ते ८ मंजुरी मिळावी.

तरी सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे घेणे बाबत आदेशार्थ सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, मा.संचालक,न.पा.प्र.स. यांचे तसेच जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांचे आदेश मनपास बंधनकारक आहेत काय ? याची तपासणी करुन फेरसादर करावे.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचेकडुन फेरप्रस्ताव सादर की, मा.शासन निर्णय मनपास बंधनकारक असल्याबाबत मनपाचे मा.मुख्यलेखापरीक्षक मा.मुख्यलेखाधिकारी, मा.नगररचनाकार यांचे अभिप्राय घेणे उचित वाटते.

सबब आदेशार्थ सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३-थ, खंड-२ अन्वये आणि शासनाच्या न्यायिक कायदेशीर कर्तव्यानुसार शासनाने नगरपालिका तसेच महानगरपालिका यांची स्थापना केली असल्याने शासनाचे निर्णय परिपत्रके, आदेश इ.म.न.पास बंधनकारक आहेत. नगरपालिका प्रशासन संचालनालय हे प्रशासनिक भूमिका बजावित असल्याने म.न.पा.स त्यांनी पारीत केलेल्या सूचना, आदेश इ.ची अंमलबजावणी करणे आवश्यक ठरते कारण त्याची एक प्रत मे.अवलोकनार्थ अग्रेषीत केलेली असते व त्याप्रमाणे कार्यवाही करणे हे शासनास अभिप्रेत असते. मात्र जिल्हा सैनिक अधिकारी व त्यांचे कार्यासन हे शासनाच्या कक्षेत नाही व शासनही नाही. सबब त्यांचे आदेश, शिफारशी या मनपास बंधनकारक नाहीत तथापि जनहितार्थ त्याची अंमलबजावणी केल्यास उचित होईल. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ अन्वये मनपा मालमत्तेसंबंधी निर्णय घेण्याचे स्वेच्छाधिकार मा.आयुक्त यांना आहेत. प्रस्तुत प्रकरणी आपले स्तरावर निर्णयार्थ सादर.

उपायुक्त यांचे दिनांक १४/०३/२०१४ च्या सूचनांनुसार विभागाने प्रस्ताव सादर करावा.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचेकडुन विनंतीपूर्वक अहवाल देण्यांत येतो की, मा.शासनाचे परिपत्रके, आदेश मनपास बंधनकारक असल्याने प्रस्ताव नमुद केल्याप्रमाणे १.अनुसूचित जाती-जमाती व भटक्या जमातीकरीता १ गाळा, २. ग्राहक भांडार स्थापनेकरीता १ गाळा, ३. फलोत्पादन संस्थेला १ गाळा, ४. अंध, अपंगासाठी १ गाळा, ५. बेरोजगार सेवा सहकारी संस्थेला १ गाळा, ६. महिला बचत गटासाठी १ गाळा राखुन ठेवणे आवश्यक आहे. तसेच ७.खादी ग्रामोद्योग मंडळासाठी १ गाळा, ८. माजी सैनिकांसाठी १ गाळा राखुन ठेवणे बाबत त्या विभागाने विनंतीपत्रे दिलेली आहेत. याबाबत मा.महासभेने निर्णय घेणे उचित होईल.

तरी सदर प्रकरणी मा.मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय घेणेबाबत आदेशार्थ सविनय सादर.

यावर उपायुक्त कर श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, कृ. तपासुन अभिप्राय द्यावा.

यावर मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे यांचा अभिप्राय की, सदर प्रस्ताव अ व ब प्रमाणे प्रस्तावात नमुद केलेला मुद्दा क्रमांक १ ते ८ नुसार कार्यवाही करणेस, अंतीम मंजुरीसाठी मा.महासभेपुढे सादर करणेस मान्यतेस्तव.

संचिका पृष्ठ क्र.२ वरील अ.क्र.१,२,४,५,६,७ स्थित शासन निर्णय असल्याने, शासन निर्णयानुसार कार्यवाही करणे संयुक्तीक ठरते.

यावर सहाय्यक आयुक्त यांचा अभिप्राय की, मार्केट विभाग प्रमुख, नगररचनाकार तसेच मुख्यलेखापरिक्षक यांनी दिलेल्या सविस्तर अहवालानुसार सदरचा विषय निर्णयाकरीता मा.महासभे समोर विचारार्थ ठेवणे उचित. सबब आदेशार्थ.

यावर मा.आयुक्त सो श्री.कुलकर्णी यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केलेनूसार मान्य.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव व फेरसादर मा.आयुक्त साहेब, मा.उपायुक्त (कर), मा.मुख्यलेखापरिक्षक , मा.सहाय्यक आयुक्त यांचे अभिप्रायासह मा. महासभेपुढे ठेविला.

--**---

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** शासन निर्णयानुसार गाळे राखीव ठेवावे.

**मा.श्री.अभय आगरकर :-** स्वातंत्र्य सैनिकांच्या माजी सैनिकांच्या ऋणातून उत्तराई होण्यासाठी त्यांच्यासाठी एक गाळा राखीव ठेवावा.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी :-** रेडीरेकनरच्या दरानुसार नगररचनाकार यांचेकडून दर निश्चीत घेतले आहेत.

**मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी साहेब :-** नगररचनाकार यांचेकडून भाडेतपासून दराची आकारणी करण्यांत येते.

**मार्केट विभाग प्रमुख श्री.तांबोळी :-** नगररचनाकार यांनी दरमहा १६०० रुपये दर हा रेडीरेकनरच्या दरानुसार ठरवुन दिलेला आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** १६००/- रुपये कशाचे आधारावर काढले.

**नगररचना विभागाचे श्री.बल्लाळ :-** दरात सवलत मिळणार नाही. शासनाच्या योजनेतून गार्डन विकसीत केले आहे. गाळयासाठी निधी मिळालेला नाही. फक्त गाळे त्यांच्यासाठी राखीव ठेवतो दिनांक २९/०६/२०१३ ला व्हॅल्युएशन तयार झाले त्यावेळचा बाजारभावानुसार भाडे दर ठरविण्यांत आला आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** सर्व साधारण व राखीव ला काय फरक आहे. मनपा झाल्यावर रेडीरेकनर कमिटी अस्तित्वात नाही.

**मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी साहेब :-** रेडीरेकनरमध्ये कन्सेशन नाही फक्त राखीव ठेवण्या बाबतचे धोरण आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** मेंटेनन्ससाठी रु.७० हजार आगाउ दरमहा ठेकेदाराला कशाच्या आधारे देतो. तिकीटही तो आकारतो त्याची दखल सुध्दा घेतली गेली नाही. शाळेच्या स्नेह संमेलनासाठी तो तिकीट घेतो. जॉगींगसाठी तो तिकीट घेतो.

**मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी साहेब :-** आपण हे दोन विषय एकत्र करु नका. हे गार्डन देण्याबाबत मा.स्थायी समितीने पूर्वी निर्णय घेतला. हे गाळे आपल्याला कमर्शियल पध्दतीने द्यावे लागतील. भाडयामध्ये काही बदल करता येणार नाही. आणि आता आपण गाळे राखीवचा निर्णय घेतो आहे.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** जनरल साठी भाडे ठेवा वेगळया पध्दतीने ठेवा अशी माझी मागणी आहे. महापौर साहेब यांनी याबाबत योग्य तो निर्णय घ्यावा.

**मा.श्री.सचिन जाधव :-** ग्राहक भांडारसाठी म्हणजे गॅससाठी ठेवला का.

**मा.महापौर साहेब :-** अन्नधान्य वितरण साठी गाळा ठेवलेला आहे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** मागच्या दिड ते दोन वर्षापूर्वी एक ठराव झालेला आहे श्री.वखारे यांना भेटलो आयुक्तांना भेटलो आपण इतका चांगला ठराव केला. गाळे धारकांकडून ३० हजार, ६० हजार घेवून गाळा ट्रान्सफर करणेबाबत कार्यवाही अद्याप केलेली नाही. नविन गाळयासाठी नगररचना विभागाकडून डिपॉझीट ठरवून घेण्यांत यावे.

**उपायुक्त श्री.बेहेरे :-** जुन २०१२ मध्ये ठराव झालेला आहे परंतू त्यामध्ये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ मधील काही बाबी जसे पूर्वीच्या गाळे धारकांकडून घेतलेले डिपॉझीट जमा करावे का ? गाळे किती वर्षासाठी भाडयाने द्यावेत, भाडेवाढ कधी करावी. याबाबत संदिग्धता असल्याने पून्हा फेरसादर केले आहे. तीन वर्षासाठी गाळा सुरुवातीला देता येईल. डिपॉझीट ही ठरवुन घेता येईल.

पूर्वीच्या गाळे धारकाकडून घेतलेले डिपॉझिट आताही पूर्वी ठरले इतके घेण्यांत येईल.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** पूर्वीच्या काही मालमत्ता धारकाकडुन महानगरपालिकेकडेस भुखंड मिळाले आहेत. ट्रान्सफर करणा-या व्यक्तींकडून त्याचेवर हरकत घेणारे काही अर्ज प्राप्त आहेत नगररचना योजना क्र. ४ अंतिम भुखंड क्र. २६२ T.P.Scheme च्या माध्यमातून तरी जागा पार्क यासाठी राखीव ठेवण्यात आली. मिस्कीन यांनी या संदर्भात तक्रारी दाखल केली असल्याने ती त्यांनी मागे घेतली बगीच्याची चौपाटी होणार आहे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** डॉ.मिस्कीन यांनी गाळयाची मागणी वगैरे केली का.

**नगररचना विभागाचे श्री.बल्लाळ :-** मालकी आपली आहे. उता-यावर नांव आपले आहे. आज तरी मागणी नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** ADTP चे जोशी सह्या करीत नाहीत. TP च्या लोकांच्या बदल्या का करत नाही हा सिरीयस विषय आहे. त्यांच्या बदल्या करा.

**मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी साहेब :-** जवळपास २ ते ३ वेळा मी या संदर्भात जॉईंट डायरेक्टर, नगररचना विभाग यांना भेटलो. मुख्यमंत्री महोदयांपर्यंत फाईल गेलेली आहे. येत्या आठवडा भरात ऑर्डर येईल. आता नेमणूक ADTP यांची आहे. जिल्हा भराचा कार्यभार त्यांच्याकडे सोपविण्यांत आलेला आहे.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** मी एका कर्मचा-याची तक्रार केली १० दिवस कर्मचारी येत नाही त्यावर कारवाई झाली नाही.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** गंगा उद्यान जवळच्या गाळयांमध्ये शासनाच्या निर्णय, परिपत्रक व मार्गदर्शक सुचनेनुसार गाळे राखीव ठेवा. सगळे गाळे टेंडर काढुन तीन वर्ष मुदतीसाठी द्या.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** एकुण गाळयाच्या संख्येचा विचार करतांना महानगरपालिकेच्या उत्पन्नाचे स्त्रोत देखील उभारणेच्या दृष्टीने विचार करणे गरजेचे आहे.

**मा.महापौर साहेब :-** सभागृहाचा कल व ऑफिस रिपोर्ट पाहता १५ पैकी ४ गाळे आरक्षीत ठेवा. आणि ११ वर्ष मुदतीसाठी भाडयाने देणेकरीता निविदा प्रक्रीया करावी.

---*---

**ठराव :-**

नगररचना योजना क्र.४ मधील, अंतिम भुखंड क्रमांक २६२, गंगा उद्यान येथील गाळयांचे निविदा पध्दतीने वाटप करणें बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर सभागृहात झालेल्या चर्चेनुसार, १) फलोत्पादन संस्थेला एक गाळा, २) बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्थेला एक गाळा, ३) अनुसूचित जाती जमाती, भटक्या विमुक्त जमाती करीता एक गाळा, ४) अंध व अपंगांकरीता एक गाळा ५) महिला बचत गटासाठी एक गाळा ६) ग्राहक भांडार स्थापने करीता एक गाळा आरक्षीत ठेवणेत यावा. व उरलेले गाळे अनारक्षीत ठेवण्यांत येवून हे सर्व १५ गाळे ११ वर्षांकरीता भाडयाने देणे करीता नियमानुसार निविदा प्रक्रीया राबविण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारुती बोराटे

अनुमोदक :- मा.श्री.संपत विजय बारस्कर — सही/-

ठराव सर्वानुमते मंजूर. — महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १२** **दिनांक : ०३ / ०९ /२०१४.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील शुभमंगल कार्यालय, सावेडी ते प्रेमदान हडको दत्त मंदिर पर्यंतच्या रस्त्यास **''स्वामी विवेकानंद मार्ग''** असे नांव देण्याबाबत श्री.संजय विठ्ठलराव घुले यांची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

--**--

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : मा.नगरसेवक श्री.संजय विठ्ठलराव घुले यांचे दिनांक ०६/०५/२०१४ रोजीचे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार रिपोर्ट देण्यांत येतो की, मा.नगरसेवक श्री.संजय विठ्ठलराव घुले यांनी दिनांक ०६/०५/२०१४ रोजी यादी देवून अहमदनगर महानगरपालिकेच्या शुभ मंगल कार्यालय सावेडी ते प्रेमदान हडको दत्त मंदिर पर्यंतच्या रस्त्यास " स्वामी विवेकानंद मार्ग " असे नाव देणेबाबत कळविले आहे. तसेच सदर पत्रामध्ये त्यांनी खालील प्रमाणे नमुद केलेले आहे. शुभ मंगल कार्यालय ते प्रेमदान हडको हा महत्वाचा रस्ता असुन या ठिकाणी मंगल कार्यालय व अनेक मान्यवर, प्रतिष्ठीत व्यक्ती राहतात. या ठिकाणी येण्यासाठी नागरिकांना पत्या अभावी गैरसोय होते. याकरीता परिसरातील नागरिकांनी या रस्त्यास **'' स्वामी विवेकानंद मार्ग ''** असे नाव देणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी शुभ मंगल कार्यालय सावेडी ते प्रेमदान हडको दत्त मंदिर पर्यंतच्या रस्त्यास यापुर्वी कोणतेही नाव दिलेले नसुन सदर रस्त्यास " स्वामी विवेकानंद मार्ग " असे नाव द्यावे याबाबत प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणे बाबत रिपोर्ट मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर शहर अभियंता श्री.एन.बी.मगर याचा अभिप्राय की, अ, प्रमाणे मान्यतेस सादर.

यावर उपायुक्त श्री.बेहेरे साहेब यांचा अभिप्राय की, अ, नूसार प्रकरण महासभेपुढे ठेवणेस हरकत नाही मे.आदेशार्थ.

यावर मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव मा.आयुक्त साहेब, मा.उपायुक्त (कर), मा.शहर अभियंता यांचे अभिप्रायासह मा. महासभेपुढे ठेविला.

**चर्चा :-**

**मा.श्री.गणेश भोसले :-** कोठी ते यश पॅलेस या रस्त्याला आनंदऋषीजी यांचे नांव देण्यांत यावे याबाबत श्री.शेटीया व माझी याबाबत यादी देतो. यादी मा.महापौर यांचेकडे देण्यात आली.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पूर्वी या संदर्भात ठराव झालेला आहे.

**मा.श्री.संजय घुले :-** दोन्ही ठराव करावेत.

**मा.महापौर साहेबः -** अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील शुभमंगल कार्यालय, सावेडी ते प्रेमदान हडको दत्त मंदिर पर्यंतच्या रस्त्यास **''स्वामी विवेकानंद मार्ग''** असे नांव देण्यास मान्यता देण्यात येत आहे. तसेच मा.श्री.गणेश भोसले आणी श्री.विपुल शेटीया यांचे यादी नुसार कोठी ते यश पॅलेस या रस्त्याला **''राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज''** असे नांव देण्यात यावे.

--**--

**ठराव :-**

अहमदनगर महानगरपालिकेच्या हद्दीतील शुभमंगल कार्यालय, सावेडी ते प्रेमदान हडको दत्त मंदिर पर्यंतच्या रस्त्यास **''स्वामी विवेकानंद मार्ग''** असे नांव देण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. तसेच कोठी ते यश पॅलेस या रस्त्याला **''राष्ट्रसंत आनंदऋषीजी महाराज** असे नांव देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच दोन्ही रस्त्यांचे नामकरण करण्याकरीता येणा-या खर्चास देखिल ही सभा मान्यता देत आहे.

**सुचक :-** मा.श्री.भोसले गणेश पुंडलिक

**अनुमोदक :-** मा.श्री.घुले संजय विठ्ठलराव

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : १३** **दिनांक : ०३ / ०९ /२०१४.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** नालेगांव स.नं.२२०,२२१ येथील मनपा तर्फे सुरु असलेल्या ३७२ घरांच्या वसाहतीला "डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर" नाव देणेबाबत त्याप्रमाणे नालेगांव स.नं.४१/२ येथील एकुण घरे ३७२ घरकुल योजनेला "महात्मा ज्योतीबा फुलेनगर " असे नामकरण करणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मा.नगरसेवक श्री.बाळासाहेब मारुतीराव बोराटे यांचे दिनांक ३१/०७/२०१४ रोजीचे पत्र आणि मा.नगरसेवक श्री. विजय नाना गव्हाळे यांचे पत्र

उपरोक्त संदर्भीय विषयानुसार रिपोर्ट देण्यात येतो की, मा.नगरसेवक श्री.बाळासाहेब मारुतीराव बोराटे यांनी दिनांक ३१/०७/२०१४ रोजी पत्र आणि मा.नगरसेवक श्री. विजय नाना गव्हाळे यांनी पत्र देवून नालेगांव स.नं.२२०,२२१ येथील मनपा तर्फे सुरु असलेल्या ३७२ घरांच्या वसाहतीला "डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर" नाव देणेबाबत त्याप्रमाणे नालेगांव स.नं.४१/२ येथील एकुण घरे ३७२ घरकुल योजनेला "महात्मा ज्योतीबा फुलेनगर " असे नाव देण्यास व वरील दोन्ही नामकरणाचा विषय येणा-या महासभेपुढे मान्यतेसाठी ठेवणेबाबत विनंती केलेली आहे.

तरी नालेगांव स.नं.२२०,२२१ येथील मनपा तर्फे सुरु असलेल्या ३७२ घरांच्या वसाहतीला व नालेगांव स.नं.४१/२ येथील एकुण घरे ३७२ घरकुल योजनेला यापुर्वी कोणतेही नाव दिलेले नसुन सदर नालेगांव स.नं.२२०,२२१ येथील मनपा तर्फे सुरु असलेल्या ३७२ घरांच्या वसाहतीला "डॉ.बाबासाहेब आंबेडकरनगर" व नालेगांव स.नं.४१/२ येथील एकुण घरे ३७२ घरकुल योजनेला "महात्मा ज्योतीबा फुलेनगर " असे नांव द्यावे याबाबत प्रस्ताव मा.महासभेपुढे ठेवणेबाबत रिपोर्ट मान्यतेस्तव तथा आदेशार्थ सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे निर्णयास्तव तथा पुढील आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, प्रस्तावित अ नुसार HSDP अंतर्गत घरकुल बांधकाम झालेले असुन त्यांना प्रस्तावित नुसार नावे देणेबाबत विषय धोरणात्मक असलेने मे.महासभेपुढे ठेवणेबाबत मे.आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव मा. आयुक्त साहेब, मा.उपायुक्त (कर), मा. शहर अभियंता यांचे अभिप्रायासह मा. महासभेपुढे ठेविला.

--**--

**चर्चा :-**

**मा.श्री.दिप चव्हाण :-** ही योजना कोणाच्या नावाने आहे. योजना नका बदलू.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** श्री.गव्हाळे साहेब यांनी जी सूचना मांडली त्यानुसार "वसाहत" अशी सुधारणा करण्यांत यावी.

मा.श्री.समद खान यांनी सभागृहात निवेदन दिले.

**मा.श्री.समद खान :-** महानगरपालिका ई-निविदा बाबत कार्यवाही करतांना मा.शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील पध्दतीनुसार ठेकेदाराचे वर्गिकरणानुसार रक्कम भरुन घेवून बयाणा रक्कम भरण्याबाबत सूट देण्यांत यावी. याबाबत ठराव करण्यांत यावा.

अशी सूचना मांडली.

**मा.श्री.अजिंक्य बोरकर :-** श्री.समद खान यांनी जी सूचना मांडली त्यास मी अनुमोदन देत आहे.

**मा.महापौर साहेब :-** मा.श्री.बाळासाहेब बोराटे व मा.श्री.विजय गव्हाळे यांचे सूचनेनुसार दोनही घरकुल योजनांना नांव देण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच मा.श्री.समद खान यांनी केलेली सूचना मंजूर. प्रशासनाने याबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

---*---

**ठराव :-**

नालेगांव स.नं.२२०, २२१ येथील मनपा तर्फे सुरु असलेल्या ३७२ घरांच्या वसाहतीला **''डॉ.बाबासाहेब आंबेडकर वसाहत ''** नाव देणेबाबत त्याप्रमाणे नालेगांव स.नं.४१/२ येथील एकुण घरे ३७२ घरकुल योजनेला **''महात्मा ज्योतीबा वसाहत ''** असे नामकरण करण्यास ही सभा मान्यता देत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. नामकरण करण्याकरीता येणा-या खर्चास मान्यता देण्यांत येत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारुती बोराटे

अनुमोदक :- मा.श्री.अजिंक्य सुधाकर बोरकर

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १३ (१)** **दिनांक : ०३ / ०९ /२०१४.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** ई-निविदा करतांना मा.शासनाच्या सार्वजनिक बांधकाम नियमावली १९८४ नुसार ठेकेदारांची बयाणा रक्कम भरुन घेण्याऐवजी त्याबद्दल नोंदणीकृत ठेकेदाराकडून ठराविक रक्कम ठेव पावती स्वरुपात ठेवून प्रमाणपत्र देणे बाबत मा.श्री.समद खान, नगरसेवक व इतर ६ नगरसेवक व नगरसेविका यांचे पत्र.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मा.नगरसेवक श्री.समद खान व इतर ६ नगरसेवक व नगरसेविका यांचे दिनांक ०३/०९/२०१४ रोजी सभागृहात दिलेले पत्र.

विनंतीपुर्वक यादी देण्यांत येते की, महानगरपालिकेच्या कामकाजामध्ये ई-निविदा कार्यपध्दती अनिवार्य करण्यांत आलेली आहे. नागरी सुविधेची विविध स्वरुपाची विकास कामे मा.शासनाच्या निधीमधुन तसेच महानगरपालिका निधीमधुन प्रस्तावित केल्यानुसार ई-निविदा काढण्यांत येतात. या ई-निविदेच्या कार्यालयीन सोपस्कारामध्ये सुलभता येण्याच्या दृष्टीने ई-निविदा करतांना मा.शासनाच्या सार्वजनिक बांधकाम नियमावली १९८४ नुसार Maharashtra as reqired by the rule 15 of the rule of registration of contractors in Appendix 11 of M.P.W. Manua l 6 th edition 1984 नुसार ज्या ठेकेदारांनी महानगरपालिकेमध्ये नोंदणीकृत ठेकेदार म्हणून नोंदणी केली आहे. अशा सर्व ठेकेदारांना सार्वजनिक बांधकाम विभागाकडील मा.शासनाचे निर्णयानुसार, ठेकेदाराच्या वर्गिकरणानुसार, ठराविक रक्कम ठेव पावतीच्या स्वरुपात महानगरपालिकेत ठेवल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र देण्यांत यावे त्याचा उपयोग त्यांना संबंधित ई-निविदेमध्ये भाग घेतांना करता येवुन सदर बयाणा रक्कम भरणेबाबत तातडीने उपाययोजना करणे बाबत आवश्यकता राहणार नाही. व त्या कामासाठी निविदा कार्यवाही मध्ये उशीर होणार नाही. सदर बाबत महानगरपालिकेच्या संबंधित विभागाने अशा स्वरुपाची कार्यवाही सुरु करावी याकरीता मा.आयुक्त यांनी योग्य ते आदेश द्यावेत. यास्तव आज रोजीच्या मा.महासभेमध्ये सदरचा ठराव करावा अशी विनंती आहे.

---*---

**चर्चा :-**

मा.श्री.समद खान यांनी सभागृहात वरिलप्रमाणे निवेदन दिले.

**मा.श्री.समद खान :-** महानगरपालिका ई-निविदा बाबत कार्यवाही करतांना मा.शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाकडील पध्दतीनुसार ठेकेदाराचे वर्गिकरणानुसार रक्कम भरुन घेवून बयाणा रक्कम भरण्याबाबत सूट देण्यांत यावी. याबाबत ठराव करण्यांत यावा.

अशी सूचना मांडली.

मा.श्री.अजिंक्य बोरकर :- श्री.समद खान यांनी जी सूचना मांडली त्यास मी अनुमोदन देत आहे.

**मा.महापौर साहेब :-** मा.श्री.बाळासाहेब बोराटे व मा.श्री.विजय गव्हाळे यांचे सूचनेनुसार दोनही घरकुल योजनांना नांव देण्याबाबत कार्यवाही करावी. तसेच मा.श्री.समद खान यांनी केलेली सूचना मंजूर. प्रशासनाने याबाबत योग्य ती पुढील कार्यवाही करावी.

---*---

**ठराव :-**

ई-निविदा करतांना मा.शासनाच्या सार्वजनिक बांधकाम नियमावली १९८४ नुसार, ठेकेदाराच्या वर्गिकरणानुसार, ठराविक रक्कम ठेव पावतीच्या स्वरुपात महानगरपालिकेत ठेवल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र देण्यांत यावे. जेणेकरुन वेळोवेळी ई-निविदेमध्ये संबंधित ठेकेदार यांनी भाग घेतांना त्यांना बयाणा रक्कम भरण्याची सुट मिळणेच्या दृष्टीने व निविदेबाबतच्या कामकाजामध्ये सुलभता येण्यासाठी, सदरची बाब तपासुन याबाबत प्रशासनाने नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.समद वहाब खान,

अनुमोदक :- मा.श्री.अजिंक्य सुधाकर बोरकर,

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १४** **दिनांक : ०३ / ०९ /२०१४.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत पुरवणी मागणीव्दारे मंजूर केलेले अतिरिक्त अनुदान वितरीत करण्याबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ : १. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. विघयो-१०२०००/१५९२/ प्र.क्र.१८९/ नवि-४ दि. ५ मार्च २००२

२. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र. विघयो-२०१३/ प्र.क्र.९६/नवि-४, दि.९जूलै २०१३

३. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. विघयो-२०१३/ प्र.क्र.६४/ विघयो, दि.११ जुलै २०१३

४. नगर विकास विभाग, शासन निर्णय क्र.पूरक- २०१३/ प्र.क्र.१०५/ नवि-४ दि.२७ ऑगस्ट २०१३

५. नगर विकास विभाग, शासन निर्ण्य क्र. पुनर्वि-२०१३/ प्र.क्र.१५६/ नवि-४ दि.२० फेब्रुवारी २०१४

६. मा.शासन निर्णय क्र. विघयो-२०१३/ प्र.क्र.१५६/नवि-४ दि. १ मार्च २०१४

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये विनंती रिपोर्ट की, सन २०१३-१४ या अर्थिक वर्षाकरीता नागरी दलितवस्ती सुधारणा योजनेअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थातील दलित प्रभागातील नागरीकांना सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अहमदनगर महानगरपालिकेस रक्कम रु.३६४.०० लक्ष इतका निधी मंजूर झालेला आहे. याबाबत संदर्भिय शासन निर्णय क्र.६ नुसार या निधीतून करावयाच्या विकास कामांसाठी संदर्भिय शासन निर्णय क्र.१ प्रमाणे विहीत केलेली कार्यपध्दती अनुसरावी असे सुचित केले आहे.

संदर्भिय मा.शासन निर्णय क्र. १ नुसार " नागरी दलित वस्ती सुधारणा योजना " या योजनेचे यापुर्वी निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करुन या योजनेचे संनियंत्रण जिल्हा स्तरावर करण्यास व ते संबंधीत जिल्हाधिकारी, यांचेकडेस सुपूर्त करण्यात शासन याद्वारे मान्यता देत आहे. सदर शासन निर्णयाच्या मार्गदर्शक महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१. या योजनेअंतर्गत नागरी स्थनिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नव बौध्दांसाठी आरक्षित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द ( विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नमूद कामे हाती घेता येतील

२. शहरातील अनुसूचित जाती व नवबौध्द यांचेसाठी आरक्षित प्रभाग तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द नागरीकांचे प्रमाण जेथे तुलनेत अधिक असेल तेथे प्राधान्याने ( उतरत्या क्रमाने) या योजनेंतर्गतची अनुज्ञेय क्मे हाती घेण्यात यावीत.

**३. योजनेअंतर्गत अनुज्ञेय असलेली कामे :-**

अ) रस्ते, पोच रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, सिमेंटीकरण (स्त्यंत अपवादात्मक परिस्थितीत वस्त्यांकरीता कच्चे रस्ते ), नाली, बांधकाम, लहान नदिच्या काठावर अथवा डोंगर उतीरावर संरक्षक भिंती तसेच कठडे बांधणे, छोटे पूल, पिण्याच्या पाण्यासाठी सोई सुविधा, (हापसा, पाण्याची टाकी) सार्वजनिक उपयोगासाठी मुता-या व शौचालये बांधणे, रस्त्यावरील विजेचे दिवे, बालवाडी, बगीचे, बगीच्यांमध्ये

पक्क्या स्वरुपाचे बसवायचे खेळाचे साहित्य, समाज मंदिर, वाचनालय, व्यायामशाळा, दवाखाने, सांस्कृतिक केंद्र, दुकाने, स्मशान भूमीचा विकास ही व या सारखी सार्वजनिक हिताची अन्य कामे हाती घेता येतील.

वरील कामांव्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस स्थानिक गरजेनुसार एखादे काम या योजनेंतर्गत हाती घ्यावयाचे असल्यास व ते योजनेच्या अटी व शर्तीची पुर्तता करीत असल्यास असे काम शासनाच्या पूर्व संमतीने घेता येऊ शकेल.

ब ) या योजनेंतर्गत कामे हाती घेतांना " पायाभूत सेवा सुविधांच्या " कामांना प्राधान्य असणे आवश्यक राहील.

क) या योजनेंतर्गत हाती घेतलेल्या कामांची भविष्यातील दुरुस्ती व देखभाल याचा खर्च स्थानिक संस्थेने स्वतःच्या निधीतून करावा. प्राप्त अनुदान कोणत्याही परिस्थितील देखभाल अथवा दुरुस्तीसाठी वापरु नये.

**४. अनुदान अनुज्ञेय होण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची कार्यपध्दती :-**

अ) या योजनेंतर्गत अनुदान अनुज्ञेय होण्यासाठी प्रस्तावित कामांची "निवड व निश्चिती" करणारा संबंधीत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव असणे आवश्यक आहे.

ब) या योजनेंतर्गत वरील नमूद केल्याप्रमाणे अनुज्ञेय प्रभागामध्ये हाती घ्यावयाच्या बांधकाम विषयक कामांसाठीचे रेखांकन/ नकाशे संबंधीत महानगरपालिकेच्या नगररचना अधिका-याकडुन मंजूर करुन घेणे आवश्यक राहील.

क) रेखांकन/ नकाशे मंजूरीनंतर हाती घ्यावयाच्या कामावरील खर्चाच्या तयार क्रण्यात आलेल्या अंदाजपत्रकास प्रचलित कार्यपध्दतीनुसार संबंधित महानगरपालिकेचे ' नगर अभियंता ' प्रस्तावास तांत्रिक मान्यता देण्यास सक्षम असतील.

ड) अशाप्रकारे रेखांकन मंजुरी तसेच तांत्रिक मंजूरी प्राप्त करुन तयार करण्यात आलेला प्रस्ताव निधीच्या उपलब्धतेसाठी संबंधीत जिल्हाधिकारी, यांचेकडेस सादर करण्यात यावा.

इ) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी शासनाने विहीत केलेल्या कार्यपध्दतीचा अवलंब करुन आवश्यक त्या सहपत्रांसह निधीच्या मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव सादर केल्यानंतर संबंधीत जिल्हाधिकारी, यांनी प्रस्तावाची सखोल तपासणी करावी. जिल्ह्यासाठी उपलब्ध असलेली तरतूद लक्षात घेऊन निधीच्या उपलब्धतेनुसार असलेली तरतूद लक्षात घेवून निधीच्या उपलब्धतेनुसार प्रस्तावास जिल्हास्तरीय समितीची " प्रशासकीय व वित्तीय " मान्यता प्रदान करावी. या योजनेंतर्गत हाती घ्यावयाच्या कामांना पूर्व प्रशासकीय मंजूरी आवश्यक असल्यामुळे कोणत्याही परिस्थितीत कार्योत्तर प्रशासकीय मंजूरी देण्यात येऊ नये.

**५. प्रस्तावासोबत सादर करावयाची प्रमाणपत्रे :-**

अ) प्रस्तावित कामांसाठी शासनाच्या इतर कोणत्याही योजनेंतर्गत अर्थसहाय्य घेतले नसल्याबाबतचे प्रमाणपत्र

ब) प्रस्तावातील काम ज्या जमिनीवर घ्यावयाचे आहे, ती जमिन महानगरपालिकेच्या ताब्यात असल्याचे प्रमाणपत्र.

क) प्रस्तावातील कामांची "निवड व निश्चिती" करणारा नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारण सभेचा ठराव

ड) प्रस्तावित काम हे ज्या वस्तीतील अनूसुचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे अथवा अनुसूचित जातीसाठी राखीव असलेल्या प्रभागातीलच असल्याबाबतचे प्रमाणपत्र

इ) सक्षम प्राधिका-यांकडुन प्राप्त झालेल्या तांत्रिक मान्यतेच्या आदेशाची प्रत.

ई) बांधकाम विषयक काम असल्यास नगररचना शाखेकडुन प्रस्तावित कामाच्या रेखांकन / नकाशांना मंजूरी प्राप्त झाल्याच्या आदेशाची प्रत.

फ) मागील अर्थिक वर्षामध्ये प्राप्त झालेल्या निधीचा पूर्णपणे विनीयोग करुन त्याचे विनीयोग प्रमाणपत्र प्रस्तावासोबत सादर करणे आवश्यक राहील.

**६) निधी वितरण विषयक कार्यपध्दती :-**

" नागरी दलितवस्ती सूधारणा योजना " या योजनेसाठी उपलब्ध जिल्हानिहाय तरतूदीचे वितरण प्रत्येक अर्थिक वर्षासाठी स्वतंत्रपणे शासनाकडुन सर्व जिल्हाधिका-यंना अर्थिक वर्षाच्या सुरुवातीस करण्यात येईल. शासनाने वितरित केलेल्या जिल्हानिहाय तरतूदी प्राप्त झाल्यानंतर जिल्ह्यातील नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांना निधीचे वितरण निश्चित करण्यासाठी खालीलप्रमाणे " जिल्हास्तरीय समिती " जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेखाली नियुक्त करण्यात येत आहे.

जिल्हास्तरीय समिती खालील प्रमाणे राहील.

| | |
|---|---|
| अ) जिल्हाधिकारी | : अध्यक्ष |
| ब) महानगरपालिकेतील नगररचना शाखा अधिकारी | : सदस्य |
| क) विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी (संबंधित जिल्हा) | : सदस्य |
| ड) संबंधित महानगरपालिकेचे आयुक्त अथवा त्यांचे प्रतिनिधी | : विशेष निमंत्रित |
| इ) जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी | : सदस्य सचिव. |

७) जिल्हास्तरीय समितीची कार्यकक्षा पुढील प्रमाणे आहे. :-

अ) जिल्हा वार्षिक योजनेत उपलब्ध असलेल्या "विशेष घटक योजनेच्या"तरतूदीमधून जिल्हयातील नागरी संस्थांची महानगरपालिका व नगरपरिषदा विचारात घेवून योजनेच्या निकषानुसार अनुज्ञेय असलेले कमाल अनुदान वितरीत करणे.

ब) जिल्हाधिकारी, यांनी या समितीची प्रत्येक आर्थिक वर्षात किमान तीन महिन्यातून एक बैठक आयोजीत करावी.

क) संबंधीत जिल्ह्याचे नगररचना शाखेच्या अधिका-यांनी जिल्ह्यातील नगरपरिषदांकडील बांधकाम विषयक कामकाज असल्यास उपरोक्त परि.(७)(ब) प्रमाणे छाननी करुन अहवाल प्रत्येक बैठकीत यावा. महानगरपालिके बाबत संबंधीत नगररचना अधिकारी यांची हीच जबाबदारी राहील.

ड) विशेष समाजकल्याण अधिकारी यांनी संबंधीत जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत उपलब्ध तरतूद पुरेशी आहे काय, हे पाहून जिल्हा नियोजन व विकास मंडळाच्या बैठकीत पुरेशी तरतूद उपलब्ध करुन घेण्याच्या दृष्टीने प्रयत्नशील रहावे. तसेच संबंधीत नागरी संस्थेने हाती घेतलेले काम योजनेच्या निकाषानुसार होत आहे किंवा कसे याबाबत "प्रत्यक्ष स्थळ पाहणी"करुन अहवाल प्रत्येक बैठकीत द्यावा.

इ) जिल्हाधिकारी कार्यालयातील नगरपालिका प्रशासनाचे अधिकारी यांनी जिल्हास्तरीय समितीच्या बैठकांचे आयोजन करणे, इतिवृत्त तयार करणे, तसेच संबंधीत नागरी संस्थांचे निधी मागणीचे परिपूर्ण प्रस्ताव उपरोक्त परिच्छेद-८ मधील कागदपत्रासह जिल्हास्तरीय समितीसमोर मंजूरीसाठी ठेवणे, मान्यता प्राप्त झाल्यानंतर संबंधीतांना कळविणे इ. कार्यवाही करुन त्याबाबतचा अहवाल प्रत्येक बैठकीत द्यावा असे नमूद आहे.

सदर योजनंतर्गत वितरीत करण्यात आलेला निधी संबंधीत आर्थिक वर्षाअखेर खर्च करणे आवश्यक राहील व त्याप्रमाणे "विनियोग प्रमाणपत्रे"एका वर्षाच्या आत सादर करणे आवश्यक राहील. (अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत विनियोग प्रमाणपत्र सादर करणेसाठी मुदतवाढ देण्यास संबंधीत जिल्हाधिकारी सक्षम असतील मात्र अशा नागरी संस्थांच्या अडचणीची खातरजमा करावी.) असे सदर शासन निर्णयामध्ये नमूद आहे.

तरी सदर योजनेतुन घ्यावयाच्या विकास कामांसाठी सदरचा ऑफिस रिपोर्ट मा.महासभेकडेस अवलोकनार्थ व निर्णयास्तव पाठविणेस आदेश होणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर शहर अभियंता श्री.एन.बी.मगर यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे एकुण रु.३६४ लक्ष अनुदानामधून घ्यावयाच्या कामाबाबत मा.जनरल बोर्डने(मा.महासभा) निर्णय घेणे आवश्यक आहे. प्रस्ताव अवलोकनार्थ तथा निर्णयास्तव मा.महासभेपुढे सादर करणे योग्य.

यावर मुख्यलेखापरिक्षक श्री.अनारसे, यांचा अभिप्राय की, शहर अभियंता यांचे अभिप्रायाप्रमाणे नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत रक्कम रु.३,६४,००,०००/- अनुदानातुन घ्यावयाचे कामाकरीता मा.महासभेपुढे प्रस्ताव निर्णयास्तव ठेवणेस मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त श्री.बेहेरे साो यांचा अभिप्राय की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजनेअंतर्गत कोणकोणत्या प्रभागात कामे करता येतील व कोणती कामे करणे आवश्यक आहेत. काही कामे तेथे यापुर्वीही झालेली असतील. सबब प्रस्तावित व मोठया स्वरुपातील कोणती कामे घ्यावीत हे शहर अभियंता यांनी सुचविणे आवश्यक वाटते. सबब प्रभागांची नावे, वस्तीची नावे व करावयाची कामे यासह प्रस्ताव महासभेस देणे उचित होईल. मे आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त साो श्री.विजय कुलकर्णी यांचा अभिप्राय की, अ नुसार मान्य.

यावर सार्व.बांधकाम विभागाकडुन दिनांक २६/०६/२०१४ रोजी फेर रिपोर्ट सादर की, सन २०१३-२०१४ या आर्थिक वर्षाकरीता नागरी दलितवस्ती सुधारणा योजनेअंतर्गत स्थानिक स्वराज्य संस्थातील दलित प्रभागातील नागरिकांना सोयी-सुविधा पुरविण्यासाठी अहमदनगरमहानगरपालिकेस रक्कम रु.३६४.०० लक्ष इतका निधी मंजूर झालेला आहे. याबाबत संदर्भीय शासन निर्णय क्र.६ नुसार या निधीतून करावयाच्या विकास कामांसाठी संदर्भीय शासन निर्णय क्र.१ प्रमाणे विहीत केलेली कार्यपध्दती अनुसरावी असे सुचित केले आहे.

संदर्भीय मा.शासन निर्णय क्र.१ नुसार "नागरी दलित वस्ती सुधारणा योजना" या योजनेचे यापुर्वी निर्गमित केलेले सर्व शासन निर्णय अधिक्रमीत करुन या योजनेचे सनियंत्रण जिल्हा स्तरावर करण्यास व ते संबंधीत जिल्हाधिकारी, यांचेकडेस सुपूर्त करण्यात शासन याव्दारे मान्यता देत आहे. सदर शासन निर्णयाच्या मार्गदर्शक महत्वाचे मुद्दे खालीलप्रमाणे आहेत.

१) या योजनेअंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नव बौध्दासाठी आरक्षित असलेल्या अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नमूद कामे हाती घेता येतील.

२) शहरातील अनुसूचित जाती व नवबौध्द यांचेसाठी आरक्षित प्रभाग तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द नागरीकांचे प्रमाण जेथे तुलनेत अधिक असेल तेथे प्राधान्याने (उतरत्या क्रमाने) या योजनेअंतर्गतची अनुज्ञेय कामे हाती घेण्यांत यावीत. असे नमूद आहे.

याशिवाय शहरातील घोषित झोपडपट्टया असलेल्या भागामध्ये सदर कामे आवश्यकतेनुसार प्रस्तावित करणे क्रमप्राप्त आहे. सदर घोषित झोपडपट्यांची यादी सोबत जोडली आहे.

तरी याबाबत आज दिनांक २६/६/२०१४ रोजी मा.आयुक्त, यांचेशी झालेल्या चर्चेनुसार प्रस्तावित करावयाच्या कामांबाबत निर्णय घेणेसाठी सदरचा ऑफिस रिपोर्ट मा.महासभेपुढे ठेवणेस आदेशार्थ स.सादर.

यावर शहरअभियंता श्री.एन.बी.मगर यांचा अभिप्राय की, योग्य वाटते. मान्यतेस फेरसादर.

यावर उपायुक्त श्री.बेहेरे साहेब यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावित केल्यानुसार सन २०१३-२०१४ मध्ये प्राप्त निधीतून घ्यावयाच्या कामांची निश्चीती करणेसाठी प्रस्ताव मे.महासभेपुढे सादर करण्यात यावा.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे ठेवणे.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव व फेरसादर मा.आयुक्त साहेब, मा.उपायुक्त (कर), मा.शहर अभियंता यांचे अभ्रिपायासह मा.महासभेपुढे ठेविला.

-- ** --

**चर्चा :-**

**मा.सौ.मालनताई ढोणे :-** कोणती कामे विकसात घेण्यात आली.

**मा.महापौर साहेब :-** यादी अजुन तयार झालेली नाही.

**शहर अभियंता श्री.मगर :-** मा.शासनाकडून ३.६४ कोटी अनुदान मंजूर झालेले आहे. अंदाजपत्रक तयार केलेले नाही. कोणते काम घ्यावयाचे त्यासाठी हा विषय घेण्यांत आला आहे. ज्या वॉर्डात ५०% पेक्षा जास्त अनुसूचिज लोकसंख्या असेल अशा ठिकाणी कामे प्रस्तावित करता येतील. सन २०१३-२०१४ साठी हे पैसे आले. सन २०१४-२०१५ मध्ये आपण निधी खर्च करु शकतो. प्रस्ताव जिल्हाधिका-यांची प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर मा.महासभेने हे ठरवायचे हे सभेने ठरवायचे.

**मा.महापौर साहेब :-** याद्या तुम्ही द्या.

**मा.श्री.सचिन जाधव :-** ज्या ठिकाणी झोपडपट्टया आहेत तेथेच कामे करावी.

**मा.सौ.छाया तिवारी :-** आमच्या मतदार संघात झोपडपट्टी मोठया प्रमाणावर आहे तेथे जास्तीत जास्त घंटागाडयाची व्यवस्था करावी कर्मचा-यांना नगरसेवकाच्या सह्या घेणेबाबत सूचना देण्यांत यावेत.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** संजयनगर हा जो भाग त्याचे मागे लिंगायत स्मशानभूमी आहे. मातंग समाजाची जागा आहे. पावसाळयात सध्या तेथे भयाण व्यवस्था आहे. ३७२ घरकुल योजना व २५२ घरकुल योजने करीता काहीतरी निर्णय घ्या. कुठलीतरी मिटींग लावा आपल्याकडे जागा आरक्षीत केलेली आहे. त्यांना स्थलांतरीत करण्यासाठी प्रयत्न करा हा निधी परत जाता कामा नये.

**मा.महापौर साहेब :-** या संदर्भात मिटींग घेवू.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** आम्ही या संदर्भात यादी देतो जे एस्टीमेट होईल त्यात याचा समावेश करण्यांत यावा.

**मा.श्री.वाकळे :-** सावेडी भागातील दलितवस्तीत शौचालय नाही त्याचा समावेश यामध्ये करण्यांत यावा.

**मा.श्री.उमेश कवडे :-** प्रभाग हद्दीत असावा का माहिती द्या.

**शहरअभियंता श्री.मगर :-** घोषित प्रभाग संपूर्ण किंवा ज्या पॉकेटची संख्या ५०% पेक्षा जास्त असेल अशा ठिकाणी काम करु शकतो.

**मा.श्री.उमेश कवडे :-** माझ्या प्रभागात गाडी नंबर १६९ बंद आहे घंटागाडया ५००० रुपये खर्चासाठी ४ ते ५ महिन्यापासुन बंद आहेत.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** मा.महापौरांना या संदर्भात अधिकार देण्यांत यावेत.

**मा.श्री.विजय गव्हाळे :-** संजयनगर झोपडपट्टीमधून काही निघत नाही. आपला अधिकार असतांना कायदेशीर कारवाई, लिगल रिटेनरला बोलावून त्यांना तेथून हटवा अन्यथा योजना मार्गी लागणार नाही.

**मा.श्री.अभय आगरकर :-** संजयनगर झोपडपट्टीमधून काही निघत नाही. आपला अधिकार असतांना कायदेशीर कारवाई, लिगल रिटेनरला बोलावून त्यांना तेथून हटवा अन्यथा योजना मार्गी लागणार नाही.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** पोलीस बंदोबस्त घेवून कारवाई करा शेजारच्या जागेत त्यांना बसवा.

**मा.श्री.कैलास गिरवले :-** प्रत्यक्ष साईट व्हीजीट करुन खरच काम करणे गरजेचे आहे का हे तपासून कामे करण्यात यावी म्हणजे कामाची क्वालीटी मिळेल.

**मा.श्री.सचिन जाधव :-** नगर शहरात ऐतिहासीक वास्तु ब-याच ठिकाणी आहेत. समाज मंदिरासाठी निधी मंजूर आहे. त्यावर काय पर्याय शोधणार.

**मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी साहेब :-** गेल्या २ वर्षापासून हा प्रश्न प्रलंबीत आहे. नगर शहरात ७ वास्तू आहेत त्याला परवानगी मिळण्यासाठी पुरातत्व विभागाकडे एक शिष्टमंडळ घेवून जाणे संदर्भात मागे ठरले पण त्यांचेकडून अद्याप पत्र आलेले नाही. परवानगी देणा-या अधिका-यास जबाबदार धरुन मा.खासदार साो यांचेशी माझी चर्चा झाली आहे. एकत्रितपणे भेटावे लागणार आहे. निधी जो प्राप्त होतो त्या कालमर्यादेत जर काम झाले नाही तर निधी परत जाईल मा.महापौर यांना विनंती, सर्वांनी मिळून प्रयत्न करणे गरजेचे आहे.

**मा.श्री.सचिन जाधव :-** यादी तयार करुन अशा प्रकरणांची यादी त्यांचेकडे पाठवा किमान दोन वर्षाच्या कालावधी नंतर तरी आपणाला परवानगी मिळू शकते.

**मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी साहेब :-** सार्वजनिक काम आपण करु शकतो.

**मा.श्री.सचिन जाधव :-** प्रायव्हेट जशी प्रकरणे पाठवतो.

**मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी साहेब :-** वैयक्तीक प्रकरणे सादर करावी लागतील.

**मा.श्री.सचिन जाधव :-** एअरडेफ्थच्या मोजमापानुसार कसे केले जाते.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे :-** टी.पी. लोकांनी ज्या पध्दतीने अंतर मोजले याबाबत त्यांना माहिती नसते अडवणूकीचे धोरण अवलंबले जाते.

**मा.श्री.दिप चव्हाण :-** दलितवस्ती अंतर्गत पान नं.४ कॉलम नं.१ वाचुन दाखविली त्याचा जी.आर कोठे फक्त राजपत्रात घोषीत झोपडपट्ट्यातच कामे करता येतील.

**शहरअभियंता श्री.मगर :-** शासन निर्णय मागवुन घेतो.

**मा.महापौर साहेब :-** शासन निर्णया प्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

--*--

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व मा.महासभेत झालेल्या चर्चेनुसार नागरी दलितवस्ती सुधारणा योजने अंतर्गत पुरवणी मागणीव्दारे मंजूर केलेले अतिरिक्त अनुदानातून करावयाची कामे घेण्याचा अधिकार मा.महापौर यांना देण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री. बोराटे चंद्रशेखर बाळासाहेब मारुती,

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना,

ठराव बहुमताने मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : १५** **दिनांक : ०३ / ०९ /२०१४.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** बुरुडगांव गावातील ग्रामस्थांचा पिण्याचा पाण्याच्या प्रश्नाबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- सौ.आलेशिया संजय पाचारणे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, बुरुडगाव, अहमदनगर यांचे दिनांक २२/०७/२०१४ अन्वये पत्र.

सौ.आलेशिया संजय पाचारणे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, बुरुडगांव यांचे संदर्भीय पत्र इकडेस प्राप्त झाले असून"बुरुडगांव येथे ३ वर्षापासून पिण्याचे पाणी मिळत नाही.बुरुडगाव हे १९९९ ला हद्दवाढीमध्ये नगर शहरामध्ये समाविष्ट करण्यांत आले व नंतर महानगरपालिका झाली व बुरुडगाव येथील नगरसेवक ही निवडून आला. त्यावेळेस बुरुडगावचा पाणी पुरवठा ग्रामपंचायत काळातील विहिरीवरुन होत होता. परंतु ते पाणीसुध्दा पिण्यास योग्य नसल्याने नगरसेवकाने पत्रांचा पाठपुरावाकरुन १६/६/२००४ रोजी मुळाडॅमचे पाणी हे बुरुडगाव येथे तत्कालीन आयुक्त श्री.सानप साहेब यांच्या हस्ते शुभारंभ करुन पाणी सोडण्यात आले. तद्नंतर १६/०९/२०११ रोजी बुरुडगाव राजकीय हव्यासापाई महानगरपालिकेतून वगळण्यात आले व त्याचदिवशी पाणी बंद करण्यात आले. तेंव्हापासून आजपर्यंत गावचा पाणी प्रश्न हा बिकट बनला आहे.

सन १६ जुन २००४ पाणी पुरवठा चालू होता. महानगरपालिकेने बुरुडगावच्या जनतेचा या नाजुक प्रश्नांचा कुठलाही विचार व अनेक आंदोलने करुन महानगरपालिकेने निर्णय घेतला नाही. महानगरपालिकेचा सर्वात जास्त त्रास हा बुरुडगांवची जनता सोसत असुन (कचरा डेपो व सिना नदीस सोडलेले गटारीचे पाणी) यामुळे बुरुडगावातील जनतेचा आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. त्यात पाण्यामुळे वेगवेगळे आजारास जनता बळी पडत आहे. वारंवार विनंती, आंदोलने करुन महानगरपालिका प्रशासनाला जाग येत नाही. त्यामुळे जनतेने कचरा डेपो बंद करण्याचा ग्रामसभेत एकमुखी ठराव केला आहे. महानगरपालिका प्रशासनाने बुरुडगावचा पाणी प्रश्न तातडीने सोडवावा अथवा कचरा डेपो बंद करण्याचा निर्णय ग्रामस्थांनी घेतल्यास त्याला सर्वस्वी महानगरपालिका प्रशासन जबाबदार राहील.

तरी माननीय आयुक्त साहेबांनी तातडीने कुठल्याही प्रकारचा विलंब न लावता तातडीने बुरुडगावचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडवावा तसे न झाल्यास स्थगित केलेले आंदोजन कोणत्याही प्रकारची सूचना न देता ग्रामस्थ चालू करतील. असे त्यांनी कळविले आहे."

या अनुषंगाने सादर की, दि.१६ जून २०११ रोजीचे मा.शासन निर्णयानुसार बुरुडगाव महानगरपालिका हद्दीतून वगळण्यात आले. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये मा.आयुक्त यांना असलेल्या अधिकार व तरतूदीनुसार महानगरपालिका हद्दीबाहेर पाणी पुरवठा करणे बंधनकारक नसल्याने तसेच वगळलेल्या बुरुडगाव हद्दीतील नळ कनेक्शन धारकाकडे मोठया प्रमाणात थकबाकी असल्याने व त्यांचेकडून वेळोवेळी मागणी करुन देखील भरणा होत नसल्याने तत्कालीन मा.आयुक्तांचे प्रशासकीय मान्यतेने संबंधीत पाणी पुरवठा बंद करण्यांत आला होता.

परंतू मध्यंतरी झालेल्या वेगवेगळया आंदोलने/मा.पालकमंत्री यांनी घेतलेली दखल महानगरपालिकेने सदरच्या विषयावर मा.महासभेत प्रस्ताव सादर करण्यांत आला. सदर निर्णयावर मा.महासभेत साधक बाधक चर्चा होवून मा.महासभा ठराव क्र.३५ दि.०४/१२/२०१२ अन्वये खालील प्रमाणे पारीत झालेला आहे.

**ठराव-** बुरुडगाव महानगरपालिका हद्दीबाहेर या भागात महानगरपालिके मार्फत पाणी पुरवठा करणे करीता सभागृहात झालेल्या चर्चेनुसार बुरुडगाव भागातील नागरीकांकडे असलेली पाणीपट्टी बाबतची थकबाकी वसूल करण्यांत यावी व मानवतेच्या दृष्टीकोनातून आठवडयातून एक दिवस बुरुडगाव भागास मीटरव्दारे पाणी पुरवठा करण्यांत यावा. याबाबत ऑफिस रिपोर्ट मध्ये नमूद केलेल्या कार्यवाही नुसार पाणी वाटप समिती गठीत करण्याबाबत तसेच मीटरने होणा-या पाणी पुरवठयाची वसुली होणेचे दृष्टीने संबंधीत समितीवर जबाबदारी निश्चीत करण्याबाबत योग्य ती नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी. ठराव सर्वानुमते मंजूर.

वरिल प्रमाणे अटी शर्तीचे पालन करणे व पारीत ठरावानुसार मागील थकबाकी तसेच समिती गठीत करणे बाबत यापूर्वी संबंधितांना वेळोवेळी कळविण्यांत आलेले आहे. परंतु त्यांचेकडून याबाबत अद्याप पावेतो काहीही कार्यवाही झालेली नसल्याने अद्याप पर्यंत बुरुडगाव भागाचा पाणी पुरवठा महानगरपालिके मार्फत करण्यांत आलेला नाही.

यास्तव बुरुडगाव भागातील पाणी पुरवठा सुरु करणे करीता मा.सरपंच/ग्रामसेवक यांनी महानगरपालिकेने पारीत केलेला ठराव क्र.३५ दि.०४/१२/२०१२ चे अनुषंगाने व इकडील पत्र क्र.१४३८ दिनांक ०४/०३/२०१३ चे पत्रातील पूर्तता केलेनंतर पाणीपुरवठा चालू करणे उचीत होईल.

मात्र सरपंच, ग्रामपंचायत बुरुडगाव यांचे दि.२२/०७/२०१४ अन्वये बुरुडगाव भागासाठी पाणीपुरवठा करावयाचा झाल्यास वरील ठरावाच्या अनुषंगाने धोरणात्मक बाब असल्याने मा.महासभेची मंजूरी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे.

१) महानगरपालिकेमार्फत आठवडयातून दोन वेळा बुरुडगाव रोड येथील संपवेल मधून पाणी उपसणेसाठी आवश्यक विद्युत पंप बसविणे, वीज कनेक्शन घेणे, उर्ध्ववाहिनीस मीटर बसविणे, इत्यादी काम बुरुडगांव ग्रामपंचायत यांनी करणे

२) उर्ध्ववाहिनी ते उंच टाकी भरणे, पाणी पुरवठयाचे नियोजन करणे, देखभाल दुरुस्ती, ग्रामपंचायत हद्दीत वैयक्तीक नळ जोड देणे इतयादी बाबी बुरुडगाव ग्रामपंचायत यांनी करणे

अ) महानगरपालिकेची असलेली पाणीपट्टीची थकबाकी संबंधितांकडून महानगरपालिकेत भरणे

ब) पुरविण्यांत येणा-या पाणी बिलाची नियमीत वसुलीचे दृष्टीने जबाबदारी निश्चीत करणेसाठी गावाचे सरपंच, ग्रामसेवक/जबाबदार व्यक्ती यांनी आपले स्तरावर समिती गठीत करुन गठीत केलेल्या समिती सदस्यांची यादी अहमदनगर महानगरपालिकेस सादर करणे

क) वरील "ब नुसार गठीत समिती सदस्य यांचेकडून अहमदनगर महानगरपालिकेच्या पाणीपट्टी व संलग्न कराची नियमीत वसूली व भरणा करुन देणार अशा आशयाचे हमीपत्र/ प्रतिज्ञापत्र सादर करणे

सदरची बाब धोरणात्मक असल्याने मा.महासभेची मंजूरी आवश्यक असल्याने मा.महासभेकडे सदरचा प्रस्ताव सादर करणे मान्यतेस्तव सादर.

यावर पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचा अभिप्राय की, सरपंच बुरुडगाव तसेच नागरीक बुरुडगाव यांची मागणी मा.महासभा ठरावाशी विसंगत असल्याने व सदर बाब धोरणात्मक स्वरुपाची असल्याने पुढील योग्य त्या आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, रिपोर्टानुसार व मा.आमदार श्री.राठोड, वि.स.सदस्य यांचे आंदोलन व सरपंच, बुरुडगांव ग्रा.प यांचे विनंती अर्जानूसार विषय महासभेत ठेवणे योग्य राहील मे.आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त श्री.कुलकर्णी साो यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव मा.आयुक्त साहेब , मा.उपायुक्त (सा.), मा.पाणीपुरवठा विभाग प्रमुख यांचे अभिप्रायासह मा. महासभेपुढे ठेविला.

-- ** --

**चर्चा -**

**मा.श्री.गणेश भोसले -** विषय क्र.१५ व १६ एकत्र घेण्यात यावेत.

**मा.महापौर -** विषय क्र.१५ व १६ एकत्र घेण्यात यावेत.

**मा.श्री.गणेश भोसले -** बुरूडगावला पाणी पुरवठा करण्यात यावा अशी मागणी मी यापुर्वी केली आहे.संपूर्ण नगर शहराचा कचरा आपण त्या ठिकाणी टाकतो . हा सर्व त्रास बुरूडगावचे नागरीक सहन करीत आहेत. त्या लोकांचा आपण विचार करायला पाहीजे.पाणी पट्टी ते टप्प्या टप्प्याने ते भरतील.कोर्टा चा कच-याच्या संदर्भातील निर्णय झालेला आहे.

**मा.अनील शिंदे -**८/११/२०१२ रोजी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे मा.पालकमंत्री यांचे समवेत मिटींग झाली. त्या मिटींगमध्ये १० दिवसांत पाणी देण्यासंदर्भात निर्णय झालेला आहे.मिटींगचे इतिवृत्त माझेकडे आहे.त्याची अंमलबजावणी का झाली नाही.तसेच बुरूडगाव कडे मोठयाप्रमाणात थकबाकी आहे याचा विचार करावा.

**मा. आयुक्त -** मा.महासभेनेच थकबाकी भरल्याशिवाय पाणी देउ नये असा ठराव केला असल्याने या निर्णयाची अंमलबजावणी केलेली नाही.

**श्री.कैलास गीरवले -** पुणे महानगरपालिकेतील उरळी कांचन,फुरसुंगी हा भाग हद्दी बाहेर असूनही पुणे महानगरपालिकेने तेथील कचरा डेपोवर विविध कामे केली आहेत. येथून पुढच्या काळात निदान पाणीपट्टी आकारू नये. तेथील १२६ कुटुंबांकडून ३.५ लक्ष रू.पाणीपट्टी पोटी मनपा. कडे जमा होणार आहेत. एवढा त्रास ते सहन करतात. विळद ,नांदगाव या गावांकडून आपण पाणीपट्टी वसूल करतो का येथून पुढच्या काळात बुरूडगावला मोफत पाणीपुरवठा करण्यात यावा.

**मा.श्री.सचिन जाधव -** फुरसुंगी प्रमाणे बुरूडगावही शासनाने दत्तक घ्यावे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे -** मागील पाणीपट्टी माफ करा .पुढची येणारी पट्टी त्यांना आकारा.

**मा.श्री.संजय घूले -** पाणी देताना कचर-याच्या गाडया ते अडवणार नाहीत याची हमीही बुरूडगाव ग्रामस्थांकडून घ्या.

**मा.महापौर -** शहराला सर्व भागास आपण दररोज पाणीपुरवठा देउ शकत नाही,मग त्यांना कसे देता येईल. मानवतेच्या दृष्टिकोनातून बुरूडगाव येथील नागरीकांना शहरातील पिण्याचे पाणी पुरवण्यास अडचण येणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**मा.श्री.अभय आगरकर -** मा.महापौर साहेब,कोणाला पाणी द्यावे कोणाला न द्यावे हा आपला अधिकार आहे. वास्तवाचा विचार व्हायला हवा.दुस-या ग्रामपंचायतीकडे थकबाकी असताना यांच्याच थकबाकी करीता कनेक्शन कट करणे योग्य नाही.याच्या पुढे ऑडीट रिपोर्ट निघणार आहे. हे तुम्ही शासनाकडे पाठवू शकता. निवडणुक डोळयासमोर ठेवून लोकांच्या हितासाठी तुम्ही जर असे निर्णय घेतले तर सर्वांच्या अडचणीचे ठरेल. या ठिकाणी पाणी त्यांनी वापरले आहे.महानगरपालिका कर्मचा-यांचे पगार वेळेवर होत नाहीत. सर्व परिस्थीतीचा विचार करता आजच्या परिस्थितीत निर्णय घेताना वास्तवाला धरून निर्णय घ्या. आर्थीक शिस्त जर पाळणार नसाल व भावनेच्या भरात घेतलेला निर्णय संस्थेला त्रासदायक ठरेल. लोकशाहीत निर्णय घेण्याचे अधिकार तुम्हाला प्रदान केले आहेत. नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टिने या बाबतीत निर्णय घ्यावा. पाणीपट्टी माफ करू नये अशी माझी भुमिका नाही.

**मा.महापौर -** अर्जा प्रमाणे बुरूडगावच्या ग्रामस्थांना पाणी देण्यात येईल.व पाणी पट्टीची वसूली कशा पध्दतीने करावी याबाबत त्यांचेशी बैठकीत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

**मा.श्री.गणेश भोसले -** मा.महापौर साहेब बुरूडगावला पाणी देण्याबाबत कार्यवाही करावी.

**मा.महापौर -** शहरातील पिण्याच्या पाणीपुरवठयास अडचण येणार नाही. याबाबत नियोजन करून मानवतेच्या दृष्टिकोनातूनआठवडयातून २ वेळेस पाणीपुरवठा करावा.तसेच थकबाकी टप्प्या टप्प्याने भरून घ्यावी.

-- ** --

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट व सभागृहात झालेली चर्चा विचारात घेता मानवतेच्या दृष्टिकोनातून बुरूडगाव येथील नागरीकांना आठवडयातून दोन वेळेस मिटरव्दारे व लोकसंख्येच्या प्रमाणात पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.तथापी शहरातील नागरीकांना होणारा पिण्याच्या पाण्याच्या पुरवठयास अडचण येणार नाही या दृष्टिने नियोजन करण्यात यावे. पाणीपट्टी थकबाकीच्या संदर्भात सभागृहाचा कल पाहता बुरूडगाव ग्रामस्थांकडे असलेली पाणीपट्टीची थकबाकी टप्प्याटप्प्याने वसूल करण्यास ही सभा मान्यता देत आहे.
तसेच पाणीपुरवठा सुरू केल्यानंतर येणा-या पाणीपट्टीच्या संदर्भात ऑफीस रिपोर्ट नुसार यापुढील वसूली करावी.

ऑफीस रिपोर्ट मंजूर. नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

सूचक :- मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले

अनुमोदक :- मा.श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारुती बोराटे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १६** **दिनांक : ०३ / ०९ /२०१४.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** बुरुडगांव थकीत पाणीपट्टी दुरुस्ती करणे व पाणीपट्टी कमी करणे बाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- सौ.आलेशिया संजय पाचारणे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, बुरुडगाव, अहमदनगर यांचे दिनांक २५/०७/२०१४ अन्वये पत्र.

उपरोक्त विषयाबाबत विनंती रिपोर्ट सादर की, सौ.आलेशिया संजय पाचारणे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, बुरुडगांव यांचे संदर्भीय पत्र इकडेस प्राप्त झाले असून त्यांनी खालीलप्रमाणे मुद्देनिहाय मागणी केलेली आहे.

"१) बुरुडगांव ग्रामपंचायत रजिष्टरनुसार (सन १९९९ चा) ग्रामपंचायत हद्दीमध्ये एकूण १६० पाणी कनेक्शन होते. परंतू सन १९९९ साली हद्दीमध्ये बुरुडगाव चा नगरपालिकेमध्ये समाविष्ट झाला. बुरुडगाव ग्रामपंचायत रजिष्टर नुसार नगरपरिषदेने १६० पाणी कनेक्शनची नोंद घेतली. परंतू यादीनुसार १ ते ३४ नळ कनेक्शन आझादनगर व व्ही.आर.डी.ई. या भागात असून म.न.पा.ने दिलेल्या पाण्याचा त्या ठिकाणी कुठलाही संबंध येत नाही. त्यांना त्यावेळी ग्रामपंचायत मालकीची विहीरीवरुन पाणी पुरवठा होत होता. त्यामुळे सोबतच्या यादीतून अ.नं.१ ते ३४ चे नळकनेक्शन धारकांना थकबाकीतून वगळण्यात यावे.

२) सोबतच्या यादीप्रमाणे ३५ ते १६० (१२६) नळ कनेक्शन यांनी म.न.पा.ने यादीप्रमाणे सन १९९९ सालापासून ते सन २०११ पर्यंतची थकबाकी दर्शविण्यांत आलेली आहे. म.न.पा.ने दि.१६ जुन २००४ या दिवसापासून प्रत्यक्षात पाणी दिले आहे. तरी म.न.पा.प्रशासनाने २००४ ते २०१० पर्यंतची थकबाकी मागणी करावी व १९९९ ते २००४ या काळातील थकबाकी यादीतून वगळावी.

३) दिनांक १६ सप्टेंबर २०११ रोजी महाराष्ट्र शासनाने बुरुडगावला म.न.पा.हद्दीतुन वगळले व म.न.पा.प्रशासनाने त्याच दिवशी पाणी देणे बंद केले. आर्थिक वर्षानुसार एप्रिल २०११ ते सप्टेंबर २०११ या कालावधीत संपूर्ण वर्षाची पाणीपट्टी आकारली आहे. तरी म.न.पा.प्रशासनाने त्याचा सखोल अभ्यास करुन त्या वार्षिक थकबाकी कमी करावी.

तरी मे साहेबांनी सोबत जोडलेल्या यादीचा व थकबाकीचा विचार करुन व बुरुडगाव ग्रामपंचायत पाणी देणे संदर्भात सहकार्य करावे.

सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे १२६ धारक सुधारीत पाणीपट्टी प्रमाणे ५० % रक्कम भरण्यास तयार आहेत. " असे कळविलेले आहे.

या अनुषंगाने सादर की,

३० जुन १९९९ रोजी तत्कालीन नगरपरिषदेची हद्दवाढ होवून १२ गावांचा समावेश नगरपरिषदेमध्ये झाला. त्यामध्ये बुरुडगावचा समावेश करण्यात आलेला होता. सदर हद्दवाढीमध्ये बुरुडगाव गावची पाणी पुरवठा योजना आहे त्या स्थितीत अहमदनगर महानगरपालिकेकडे ताब्यात आली. तेव्हापासून तत्कालीन नगरपरिषदेमार्फत बुरुडगाव गावासाठी पाणी पुरवठा करण्यात येत होता. पाणीपुरवठा योजना राबविणेसाठी तत्कालीन नगरपरिषदेस आस्थापना खर्च देखभाल दुरुस्ती, वाढीव पाईप लाईन टाकणे इत्यादी कामे केलेली असून त्यापोटी अहमदनगर नगरपरिषदेचा खर्च झालेला आहे. बुरुडगाव गावातील नागरिकांकडे

महानगरपालिकेची दिनांक ३१ मार्च २०१२ अखेर पाणीपट्टीची एकूण थकबाकी २०,१५,०९०/- इतकी असून त्यांना वेळोवेळी नोटीसा देवून व मागणी करुनही अद्याप पर्यंत त्यांना पाणी पट्‌टीची रक्कम भरलेली नाही.

इतर तत्कालीन अहमदनगर नगरपरिषद हद्दीत बुरुडगाव ग्रामपंचायतीसह ५ ग्रामपंचायती व १२ गावे समाविष्ट झालेली असून त्या भागाचा पाणी पुरवठा योजनेवर तत्कालीन नगरपरिषदेने खर्च केलेला असून नागरिकांकडून पाणीपट्टी वसुली करण्यात आलेली आहे. अर्जात नमूद केलेनुसार आझादनगर व व्ही.आर.डी.ई. हा भाग ही बुरुडगाव ग्रामपंचायतीचाच भाग असून या भागासही नगरपरिषदे मार्फत पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. बुरुडगाव ग्रामपंचायत हद्दीतील एकूण १६० नळ कनेक्शन करीता तत्कालीन नगरपरिषद व सध्याची अहमदनगर महानगरपालिका मार्फत आकारण्यात आलेली पाणीपट्टी योग्य आहे. अर्जदाराने नमूद केलेल्या बाबी प्रशासनाची दिशाभूल करणारी असून विचारात घेणे योग्य नाही.

बुरुडगाव ग्रामपंचायतीने नगरपरिषद व महानगरपालिकेमार्फत आकारण्यात आलेली पाणीपट्टीची थकबाकी मा.महासभा ठराव क्र.३५ दिनांक ०४/१२/२०१२ अन्वये महानगरपालिकेकडे भरणे आवश्यक आहे. याबाबत त्यांना वेळोवेळी कळविलेले असूनही त्यांनी त्याबाबत कुठलीही दखल घेतलेली नाही. करीता बुरुडगाव ग्रमपंचायत यांना पा.पु.जा.क्र.१४३८ दिनांक ०४/०३/२०१३ अन्वये कळविलेनुसार त्यांचेकडून कार्यवाही झाल्यास बुरुडगाव गावास उपरोक्त ठरावानुसार पाणी पुरवठा करता येईल.

मात्र सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, बुरुडगाव यांचे संदर्भीय पत्रान्वये पाणीपट्टी कमी करणे ही बाब धोरणात्मक असल्याने मा.महासभेची मंजूरी आवश्यक असल्याने मा.महासभेकडे सदरचा प्रस्ताव सादर करणे मान्यतेस्तव. तथापि आदेशार्थ सविनय सादर.

यावर उपायुक्त श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, उक्त संदर्भीय सरपंच, बुरुडगाव ग्रा.पं.यांच्या पत्रानुसार मुद्देसुद उत्तरासह संबंधित लिपीक व प्र.अ.यांनी समक्ष चर्चा करावी.

यावर उपरोक्त विषयाबाबत दिनांक ०६/०८/२०१४ रोजी मा.फेरसादर रिपोर्ट की, मा.सौ.आलेशिया संजय पाचारणे, सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, बुरुडगाव यांचे संदर्भीय पत्रा अनुषंगाने मा.उपायुक्त कर यांचेशी समक्ष झालेल्या चर्चेनुसार निर्देशीत मुद्यांबाबत अहवाल खालील प्रमाणे आहे.

१) बुरुडगांव ग्रामपंचायत रजिष्टरनुसार (सन १९९९ चा) ग्रामपंचायत हद्दीमध्ये एकूण १६० पाणी कनेक्शन होते. परंतू सन १९९९ साली हद्दीमध्ये बुरुडगाव चा नगरपालिकेमध्ये समाविष्ट झाला. बुरुडगाव ग्रामपंचायत रजिष्टर नुसार नगरपरिषदेने १६० पाणी कनेक्शनची नोंद घेतली. परंतू यादीनुसार १ ते ३४ नळ कनेक्शन आझादनगर व व्ही.आर.डी.ई. या भागात असून म.न.पा.ने दिलेल्या पाण्याचा त्या ठिकाणी कुठलाही संबंध येत नाही. त्यांना त्यावेळी ग्रामपंचायत मालकीची विहीरीवरुन पाणी पुरवठा होत होता. त्यामुळे सोबतच्या यादीतून अ.नं.१ ते ३४ चे नळकनेक्शन धारकांना थकबाकीतून वगळण्यात यावे.

दि.३० जुन १९९९ रोजी तत्कालीन नगरपरिषदेची हद्दवाढ होवून १२ गावांचा समावेश नगरपरिषदेमध्ये झाला. त्यामध्ये बुरुडगावचा समावेश करण्यात आलेला होता. तेव्हापासून बुरुडगाव गावची पाणी पुरवठा योजना आहे त्या स्थितीत तत्कालीन अहमदनगर नगरपरिषदेकडे ताब्यात आली. बुरुडगाव ग्रामपंचायत रेकॉर्ड नुसार असलेल्या १६० पाणी ग्राहकांना नगरपरिषदे मार्फत बुरुडगाव गावासाठी पाणी पुरवठा करण्यात येत होता. सदरचा पाणी पुरवठा करतांना नगरपरिषदेस आस्थापना खर्च, दैनंदिन, देखभाल दुरुस्ती, वाढीव पाईप लाईन टाकणे इत्यादी कामे केलेली असून त्यापोटी अहमदनगर नगरपरिषदेचा खर्च झालेला आहे. त्यामुळे संदर्भीय यादीतील पत्रासोबतच्या मुद्दा क्र.१ नुसार अ.नं.१ ते ३४ चे नळ कनेक्शन धारकांना थकबाकीतून वगळणे संयुक्तीक नाही.

२) सोबतच्या यादीप्रमाणे ३५ ते १६० (१२६) नळ कनेक्शन यांनी म.न.पा.ने यादीप्रमाणे सन १९९९ सालापासून ते सन २०११ पर्यंतची थकबाकी दर्शविण्यांत आलेली आहे. म.न.पा.ने दि.१६ जुन २००४ या

दिवसापासून प्रत्यक्षात पाणी दिले आहे. तरी म.न.पा.प्रशासनाने २००४ ते २०१० पर्यंतची थकबाकी मागणी करावी व १९९९ ते २००४ या काळातील थकबाकी यादीतून वगळावी.

सन १९९९ ला अहमदनगर नगरपरिषदेत समाविष्ठ झालेल्या बुरुडगाव ग्रामपंचायत हद्दीतील नागरिकांना १९९९ ते २००४ अखेर तेथील विहिरीमधून दैनंदिन पाणी पुरवठा करणेसाठी तत्कालीन नगरपरिषदेस आस्थापना खर्च, दैनंदिन देखभाल, दुरुस्ती, वाढीव पाईप लाईन टाकणे इत्यादी कामे करतांना मोठया प्रमाणात निधी खर्च झालेला आहे. त्याचप्रमाणे दैनंदिन पाणी पुरवठयासह इतर नागरी सोयी सुविधावर नगरपालिकेचा/ महानगरपालिकेचा मोठया प्रमाणावर खर्च झालेला आहे. व आझादनगर व व्ही.आर.डी.ई. हा भाग ही बुरुडगांव ग्रामपंचायतीचाच भाग असून या भागासही नगरपरिषदेमार्फत पाणी पुरवठा करण्यात आलेला आहे. व महानगरपालिकेने केलेली पाणी बीलाची आकारणी योग्य व रीतसर आहे. त्यामुळे संदर्भीय अर्जातील मुद्दा क्र.२ नुसार नमूद केलेनुसार १९९९ ते २००४ या काळातील थकबाकी यादीतून वगळणे संयुक्तीक नाही.

३) दिनांक १६ सप्टेंबर २०११ रोजी महाराष्ट्र शासनाने बुरुडगावला म.न.पा.हद्दीतुन वगळले व म.न.पा.प्रशासनाने त्याच दिवशी पाणी देणे बंद केले. आर्थिक वर्षानुसार एप्रिल २०११ ते सप्टेंबर २०११ या कालावधीत संपूर्ण वर्षाची पाणीपट्टी आकारली आहे. तरी म.न.पा.प्रशासनाने त्याचा सखोल अभ्यास करुन त्या वार्षिक थकबाकी कमी करावी.

अहमदनगर महानगरपालिकेच्या नियमानुसार व प्रचलीत पध्दतीप्रमाणे ६ महिने पाणी पुरवठा झालेला असला तरी संपूर्ण वर्षाची पाणीपट्टी पाणी ग्राहकांना देय असून त्यांचेकडून सदरची रक्कम वसूल करणे आवश्यक व क्रमप्राप्त आहे. परंतु प्राप्त परिस्थितीत मा.उपायुक्त (कर) यांनी दिलेल्या निर्देशानुसार सन २०११-२०१२ या वित्तीय वर्षामध्ये आकारलेली संपूर्ण वर्षाची पाणीपट्टी रद्द करुन पहिले सहा महिन्यांची पाणीपट्टी आकारणी करुन सदरची थकबाकी रक्कम संबंधितांकडून वसूल करावी लागेल.

वरील सर्व बाबींचे अवलोकन करता मा.सरपंच, ग्रामपंचायत कार्यालय, बुरुडगाव यांचे संदर्भीय पत्रान्वये सोबत जोडलेल्या यादीचा व थकबाकीचा विचार करुन व बुरुडगाव ग्रामपंचायत पाणी देणे संदर्भात सहकार्य करावे. सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे १२६ धारक सुधारीत पाणीपट्टी प्रमाणे ५०% रक्कम भरण्यास तयार आहोत. अशी मागणी मान्य करणे संयुक्तीक होणार नाही.

यास्तव बुरुडगाव ग्रामपंचायतीने नगरपरिषद व महानगरपालिकेमार्फत आकारण्यात आलेली पाणीपट्टीची थकबाकी मा.महासभा ठराव क्र.३५ दिनांक ०४/१२/२०१२ अन्वये महानगरपालिकेकडे भरणे आवश्यक आहे. याबाबत त्यांना वेळोवेळी कळविलेले असूनही त्यांनी त्याबाबत कुठलीही दखल घेतलेली नाही. करीता बुरुडगाव ग्रामपंचायत यांना पा.पु.जा.क्र.१४३८ दिनांक ०४/०३/२०१३ अन्वये कळविलेनुसार त्यांचेकडुन कार्यवाही झाल्यास बुरुडगाव गावास उपरोक्त ठरावानुसार पाणी पुरवठा करता येईल.

परंतू बाब धोरणात्मक असल्याने मा.महासभेची मंजूरी आवश्यक असल्याने मा.महासभेकडे सदरचा प्रस्ताव सादर करणे मान्यतेस्तव.

तथापि आदेशार्थ सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे साो यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावित केलेनूसार व मा.सरपंच, बुरुडगांव ग्रा.पं. तसेच मा.आ.श्री.अनिल राठोड वि.स.सदस्य यांचे आदोलन, चर्चा, दुरुस्तीनुसार प्रस्तावित केले प्रमाणे सर्व प्रथम जेव्हा बुरुडगाव तत्कालीन नगरपरिषद हद्दीत समाविष्ट झाले ते जून १९९९ मध्ये म्हणजेच सन १९९९-२००० या आर्थिक वर्षातील ९ महिने (जुलै-९९ ते मार्च २०००) तसेच सन २०११ मध्ये

दि.१६ सप्टेंबर २०११ रोजी उक्त बुरुडगाव मनपा हद्दीतून वगळण्यांत आले आहे. म्हणजेच सन २०११-२०१२ मध्ये किमान एप्रिल २०११ ते सप्टेंबर २०१२ या सहामहिन्यांची पाणीपट्टी आकारणे योग्य राहील. त्यानूसार किमान दुरुस्ती करणेत यावी. व प्रस्तावित नुसार संबंधीतांस कळवून त्यांचा अर्ज निकाली काढणेत यावा.

तसेच त्यांचे अर्जानूसार पुनश्चः पाणीपुरवठा करणेत यावा. याकरीता सदर क्षेत्र मनपा हद्दीबाहेर असलेने याबाबतचा विषय मे महासभेपुढे ठेवून निर्णय व्हावा असे मत आहे.

तथापि मे आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त श्री.विजय कुलकर्णी यांचा अभिप्राय की, मनपा ने बुरुडगाव हद्दीत नळ कने.कधी पासुन पा.पु.सुरु केला व तेथ पासुनची पाणी कनेक्शनची संख्या व पाणीपट्टीची रक्कम याचा तपशील सादर करा.

यावर फेरसादर विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो की, प्रभाग समिती क्र.४ बुरुडगाव विभाग बुरुडगांव ग्रामपंचायत हे गांव सन १९९९ तत्कालीन नगरपालिका हद्दवाढीमध्ये समाविष्ठ झाले परंतु महानगरपालिकेने दि.१६-६-२००४ रोजी बुरुडगांवला नळाव्दारे पाणीपुरवठा सुरु केला त्यावेळी बुरुडगांव ग्रामपंचायत हद्दीमध्ये एकुण १६० नळाच्या नोंदी होत्या परंतु ३४ नळकनेक्शन हे व्ही.आर.डी.ई., आझादनगर येथे होते. बुरुडगांव ग्रामपंचायत येथे एकुण १२६ नळकनेक्शन होते. सन २००४-२००५ या वर्षी घरगुती वापराकरीता १/२" करीता १५००/- दर अस्तित्वात होता. त्यानुसार सन २००४ ते २६-९-२०११ अखेर खालील तक्त्यात दर्शविल्याप्रमाणे बुरुडगाव ग्रामपंचायतीकडुन पाणीपट्टी वसुल करणे योग्य राहील.

| अ.क्र. | सन | नळकनेक्शन संख्या | दर | रक्कम |
|---|---|---|---|---|
| १ | २००४-२००५ | १२६ | १५००/-(नउ महिने) | १४१७५० |
| २ | २००५-२००६ | १२६ | १५००/- | १८९००० |
| ३ | २००६-२००७ | १२६ | १५००/- | १८९००० |
| ४ | २००७-२००८ | १२६ | १५००/- | १८९००० |
| ५ | २००८-२००९ | १२६ | १५००/- | १८९००० |
| ६ | २००९-२०१० | १२६ | १५००/- | १८९००० |
| ७ | २०१०-२०११ | १२६ | १५००/- (सहा महिने) | ९४५०० |
| | | | | ११,८१,२५०/- |

वरील तक्त्यात दर्शविण्यात आलेली दिनांक १६-६-२००४ ते २६-९-११ अखेर थकीत पाणीपट्टीची रक्कम रुपये ११,८१,२५०/- वसुल करणे योग्य राहील सबब आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त (कर) श्री.बेहेरे यांचा अभिप्राय की, विभागाने प्रस्तावित केलेनूसार व सरपंच, बुरुडगाव ग्रामपंचायत यांनी आज आपलेशी केलेल्या चर्चेनूसार व मा.श्री.अनिल राठोड यांचे दुरध्वनीवरील चर्चेनुसार सुधारीत पाणीपट्टीची बील संबंधीतास कळविणे योग्य राहील. मे आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त सो श्री.विजय कुलकर्णी यांचा अभिप्राय की, संबंधित बुरुडगाव ग्रा.पं.चे सन्मा सरपंच व त्यांचे शिष्टमंडळाने माझी भेट घेतली व मनपाने सन२००४ पासुन नळाव्दारे पाणीपुरवठा केला व तेथपासुनची पाणीपट्टीची निम्मी रक्कम भरणेस ते तयार असलेचे व निम्मी रक्कम भरणेस मनपाने मुदत द्यावी अशी विनंती त्यांनी केली आहे. तथापि याबाबत मनपा ने महासभा ठराव क्र.३५ दिनांक ०४/१२/२०१२ अन्वये संपुर्ण रक्कम भरलेनंतर पा.पु.सुरु करावा असे सुचित केले असल्याचे त्यांचे निदर्शनास आणणेत

आले आहे. तथापि बुरुडगाव हद्दीतील कचरा डेपो व सीना नदीचे प्रदुषणाचा प्रादुर्भाव बुरुडगाव हद्दीतील नागरिकांना होत असल्याचे त्यांनी निदर्शनास आणले. त्यावर मनपा हद्दीत असलेचे प्रयत्न व नियोजनाची माहिती त्यांना देणेत आली. यावर पाणीप्रश्नाकडे गांभीर्याने व सहानुभूतीपुर्वक विचार करणेची विनंती त्यांनी केली आहे. तरी नमूद विषयी योग्य त्या निर्णयार्थ सदरचा विषय मे.महासभेकडे तत्काळ सादर करणेत यावा.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव व फेरसादर मा.आयुक्त साहेब, मा.उपायुक्त (कर) यांचे अभिप्रायासह मा.महासभेपुढे ठेविला.

-- ** --

**चर्चा -**

**मा.श्री.गणेश भोसले -** विषय क्र.१५ व १६ एकत्र घेण्यात यावेत.

**मा.महापौर -** विषय क्र.१५ व १६ एकत्र घेण्यात यावेत.

**मा.श्री.गणेश भोसले -** बुरूडगावला पाणी पुरवठा करण्यात यावा अशी मागणी मी यापुर्वी केली आहे.संपूर्ण नगर शहराचा कचरा आपण त्या ठिकाणी टाकतो . हा सर्व त्रास बुरूडगावचे नागरीक सहन करीत आहेत. त्या लोकांचा आपण विचार करायला पाहीजे.पाणी पट्टी ते टप्प्या टप्प्याने ते भरतील.कोर्टा चा कच-याच्या संदर्भातील निर्णय झालेला आहे.

**मा.अनील शिंदे -**८/११/२०१२ रोजी मा.जिल्हाधिकारी यांचेकडे मा.पालकमंत्री यांचे समवेत मिटींग झाली. त्या मिटींगमध्ये १० दिवसांत पाणी देण्यासंदर्भात निर्णय झालेला आहे.मिटींगचे इतिवृत्त माझेकडे आहे.त्याची अंमलबजावणी का झाली नाही.तसेच बुरूडगाव कडे मोठयाप्रमाणात थकबाकी आहे याचा विचार करावा.

**मा. आयुक्त -** मा.महासभेनेच थकबाकी भरल्याशिवाय पाणी देउ नये असा ठराव केला असल्याने या निर्णयाची अंमलबजावणी केलेली नाही.

**श्री.कैलास गीरवले -** पुणे महानगरपालिकेतील उरळी कांचन,फुरसुंगी हा भाग हद्दी बाहेर असूनही पुणे महानगरपालिकेने तेथील कचरा डेपोवर विविध कामे केली आहेत. येथून पुढच्या काळात निदान पाणीपट्टी आकारू नये. तेथील १२६ कुटुंबांकडून ३.५ लक्ष रू.पाणीपट्टी पोटी मनपा. कडे जमा होणार आहेत. एवढा त्रास ते सहन करतात. विळद ,नांदगाव या गावांकडून आपण पाणीपट्टी वसूल करतो का येथून पुढच्या काळात बुरूडगावला मोफत पाणीपुरवठा करण्यात यावा.

**मा.श्री.सचिन जाधव -** फुरसुंगी प्रमाणे बुरूडगावही शासनाने दत्तक घ्यावे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे -** मागील पाणीपट्टी माफ करा .पुढची येणारी पट्टी त्यांना आकारा.

**मा.श्री.संजय घूले -** पाणी देताना कचर-याच्या गाडया ते अडवणार नाहीत याची हमीही बुरूडगाव ग्रामस्थांकडून घ्या.

**मा.महापौर -** शहराला सर्व भागास आपण दररोज पाणीपुरवठा देउ शकत नाही,मग त्यांना कसे देता येईल.मानवतेच्या दृष्टिकोनातून बुरूडगाव येथील नागरीकांना शहरातील पिण्याचे पाणी पुरवण्यास अडचण येणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**मा.श्री.अभय आगरकर -** मा.महापौर साहेब,कोणाला पाणी द्यावे कोणाला न द्यावे हा आपला अधिकार आहे. वास्तवाचा विचार व्हायला हवा.दुस-या ग्रामपंचायतीकडे थकबाकी असताना यांच्याच थकबाकी करीता कनेक्शन कट करणे योग्य नाही.याच्या पुढे ऑडीट रिपोर्ट निघणार आहे. हे तुम्ही

शासनाकडे पाठवू शकता. निवडणुक डोळयासमोर ठेवून लोकांच्या हितासाठी तुम्ही जर असे निर्णय घेतले तर सर्वांच्या अडचणीचे ठरेल. या ठिकाणी पाणी त्यांनी वापरले आहे. महानगरपालिका कर्मचा-यांचे पगार वेळेवर होत नाहीत. सर्व परिस्थीतीचा विचार करता आजच्या परिस्थितीत निर्णय घेताना वास्तवाला धरून निर्णय घ्या. आर्थीक शिस्त जर पाळणार नसाल व भावनेच्या भरात घेतलेला निर्णय संस्थेला त्रासदायक ठरेल. लोकशाहीत निर्णय घेण्याचे अधिकार तुम्हाला प्रदान केले आहेत. नैसर्गीक न्यायतत्वाच्या दृष्टिने या बाबतीत निर्णय घ्यावा. पाणीपट्टी माफ करू नये अशी माझी भुमिका नाही.

**मा.महापौर -** अर्जा प्रमाणे बुरूडगावच्या ग्रामस्थांना पाणी देण्यात येईल.व पाणी पट्टीची वसूली कशा पध्दतीने करावी याबाबत त्यांचेशी बैठकीत चर्चा करून निर्णय घेण्यात येईल.

**मा.श्री.गणेश भोसले -** मा.महापौर साहेब बुरूडगावला पाणी देण्याबाबत कार्यवाही करावी.

**मा.महापौर -** शहरातील पिण्याच्या पाणीपुरवठयास अडचण येणार नाही. याबाबत नियोजन करून मानवतेच्या दृष्टिकोनातूनआठवडयातून २ वेळेस पाणीपुरवठा करावा.तसेच थकबाकी टप्प्या टप्प्याने भरून घ्यावी.

-- ** --

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्टनुसार सुधारीत थकबाकीची रक्कम बुरुडगांव ग्रामपंचायत यांचेकडुन टप्प्याटप्प्याने वसुल करण्यांत यावी. सद्यस्थितीत पाणीपुरवठा चालू करण्यात यावा.

नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करावी.

सूचक :- मा.श्री.गणेश पुंडलिक भोसले

अनुमोदक - मा.श्री.बाळासाहेब चंद्रशेखर मारुती बोराटे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १७** **दिनांक : ०३/०९/२०१४**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिका बुरुडगांव स.नं.३४ (पैकी) येथील कचरा डेपोच्या जागे संदर्भात मा.NATIONAL GREEN TRIBUNAL, WESTERN ZONE BENCH, PUNE येथे APPLICATION NO.९ (THC)/२०१३ (WZ)चे अंतरीम आदेश बाबत निर्णय घेणेस्तव प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावावर विचारविनिमय करुन निर्णय घेणे.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त विषयान्वये सादर करण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव स.नं.३४ (पैकी) या ठिकाणी महानगरपालिकेच्या मालकीच्या २० एकर जागेवर शहरात शहरात दैनंदिन निर्माण होणा-या अंदाजे १२५ मे.टन प्रतिदिन कच-याची साटवणुक करण्यात येते. बुरुडगांव येथील नागरीक श्री.भाउसाहेब भिमाजी कुलट व इतर यांनी मा.NATIONAL GREEN TRIBUNAL, WESTERN ZONE BENCH, PUNE येथे कचरा डेपोच्या जागे संदर्भात APPLICATION NO.९ (THC)/२०१३ (WZ) दावा दाखल केलेला आहे.

बुरुडगांव स.नं.३४ या ठिकाणी महानगरपालिके मार्फत शहरात निर्माण होणा-या दैनंदिन घनकच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व विल्हेवाट लावणे करीता BOT तत्वावर ६ वेळेस ई-निविदा मागविण्यात आल्या परंतु सदर निविदेस प्रतिसाद मिळाला नाही. मा. मा.NATIONAL GREEN TRIBUNAL, WESTERN ZONE BENCH, PUNE कोर्टाने दिनांक २२/०१/२०१४ रोजी दिलेल्या अंतरीम आदेशामध्ये महानगरपालिकेने ३ महिन्याच्या कालावधी मध्ये खत निर्मिती प्रकल्प उभारुन प्रत्यक्ष खत निर्मितीस प्रारंभ करणे बाबत आदेशीत केले. प्रकल्प उभारणी मुदत माहे मे अखेर पर्यंत असल्याचे आदेशात नमुद केले आहे. महानगरपालिके मार्फत वारंवार BOT तत्वावर मागविण्यात आलेल्या निविदेस कुठलाही प्रतिसाद मिळत नसल्यामुळे दिनांक १४/०२/२०१४ रोजी ई-निविदा क्रमांक ७०३ अन्वये Expression of Interest मागविण्यात आले. याबाबत केवळ एकच एजन्सी पार्श्व एन्टरप्राईजेस चिंचवड, पुणे यांचा प्रस्ताव प्राप्त झाला. दरम्यान दिनांक ०५/०३/२०१४ रोजी लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीची आचार संहिता लागु झाल्यामुळे प्रस्ताव मा.स्थायी समितीकडेस सादर करता आला नाही. मे.कोर्टाकडेस तसे प्रतिज्ञापत्र सादर केले. मे.कोर्टाने दिनांक १८/०३/२०१४ रोजी दिलेल्या अंतरीम आदेशानुसार मा.मुख्य निवडणुक अधिकारी महाराष्ट्र राज्य यांचेकडेस लोकसभा निवडणुकीच्या आचार संहिता कालावधी मध्ये कच-यावर प्रक्रीया करणे व सॅनेटरी लॅण्ड फील साईट विकसीत करणे करीता एजन्सी करीता तातडीने स्थायी समितीची सभा बोलविणे करीता मान्यता मिळणे बाबत दिनांक १९/०३/२०१४ रोजी पत्र देण्यात आले. परंतु सदर बाबत मा.मुख्य निवडणुक अधिकारी यांचेकडुन मंजूरी मिळाली नाही.

मे.कोर्टाने दिनांक ३०/०५/२०१४ रोजी खालील प्रमाणे अंतरीम आदेश दिले. यामध्ये महानगरपालिकेने मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस रु.५ लक्ष रक्कम डिपॉझीट करणे, महानगरपालिकने ३ महिन्याच्या कालावधीमध्ये खत निर्मिती प्रकल्प उभारुन प्रत्यक्ष खत निर्मिती सुरु करणे तसेच ३ महिन्यात कच-यावर प्रक्रीया न केल्यास मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस जमा करण्यात येणारी रक्कम कचरा डेपो भोवतील राहणा-या तक्रारदार यांना नुकसान भरपाई म्हणुन देण्यात येईल. असे नमुद केले.

तद्नंतर मा.लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता समाप्त झाल्यानंतर **मा.स्थायी समितीने सभा क्र.२ विषय क्र.१३ दिनांक ०२/०६/२०१४ अन्वये खालील प्रमाणे ठराव पारीत केला आहे.**

**ठराव -** अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगांव स.नं.३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबत ऑफिस रिपोर्टावर झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

वाटाघाटी स्थायी समिती समोर करा व याकरीता पुढील सभेमध्ये हा विषय घेईल त्या दिवशी समक्ष वाटाघाटी करण्याकरीता प्रकल्प विभागाने समितीच्या सभेमध्ये संबंधीत एजन्सीला उपस्थित ठेवण्याची व्यवस्था करावी. तोपर्यत हा विषय तहकुब ठेवण्यांत येत आहे. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

मे.कोर्टाचे दिनांक ३०/०५/२०१४ चे आदेशानुसार मा.सभापती स्थायी समिती यांना दिनांक २४/०६/२०१४ व दिनांक ३०/०६/२०१४ रोजी Expression of Interest प्रस्ताव तातडीने घेणे बाबत पत्र देण्यात आले.

तद्नंतर मा.स्थायी समितीकडेस प्रस्ताव फेर सादर केला असता **सभा क्र.४ ठराव क्र.४३ दिनांक ०८/०७/२०१४ रोजी मा.स्थायी समितीने खालील प्रमाणे ठराव पारीत केला.**

**ठराव -** मा.स्थायी समिती ठराव क्र.१३ दि.०२/०६/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगाव स.नं.३४ पैकी येथील कचरा डेपो या ठिकाणी जमा असलेल्या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्ती बाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबत सर्वानुमते ठराव करण्यात येतो की, जेथे या ठेकेदाराचे प्रकल्प चालु आहेत येथे जाउन पाहणी करण्यात येईल. चर्चा करु प्रशासनाने ठरवलेले दर ठेकेदारास मान्य असल्याने प्रकल्पाची पाहणी करुन पुढील सभेत निर्णय घेण्यात येईल. नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात यावी.

तद्नंतर मा.स्थायी समितीकडेस पुन्हा प्रस्ताव फेर सादर करण्यात आला असता मा.स्थायी समितीने सभा क्र.५, ठराव क्रमांक **४७ दिनांक- ०६/०८/२०१४ ठराव पारित केला.**

**ठराव-** मा.स्थायी समिती ठराव क्र.४३ दि.८/७/२०१४ अन्वये अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगाव स. नं.३४ पैकी येथील कचरा डेपो या कच-याची विल्हेवाट लावणे करीता एजन्सी नियुक्तीबाबत मागविण्यात आलेल्या एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट बाबतचा ऑफिस रिपोर्ट तसेच मा.स्थायी समितीमध्ये झालेल्या चर्चेनुसार ठराव करण्यात येतो की, पार्श्व एन्टप्राईजेस यांचा बार्शी नगरपरिषद येथील ३० मे. टन प्रती दिन क्षमतेचा कचरा प्रक्रिया प्रकल्प अद्याप पर्यंत कार्यान्वीत झालेला नाही असे निदर्शनास आले आहे. तसेच यांचा अन्य पकल्प कोठेही सुरु नाही, त्यामुळे या एजन्सीला अशा प्रकारच्या कामाचा विस्तृत अनुभव नाही असेही निदर्शनास येते. तसेच अहमदनगर महानगरपालिकेचा नियोजीत खत प्रकल्प प्रती दिन १२५ मे.टन प्रती दिन क्षमतेचा आहे, त्यामुळे इतक्या मोठ्या प्रमाणात प्रकल्प सदरची एजन्सी उभारुन चालवू शकणार नाही. सबब पार्श्व एन्टप्राईजेस यांचा कच-यावर शास्त्रोक्त पध्दतीने प्रक्रिया व विल्हेवाट करणे कामी प्राप्त झालेला एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट रद्द करण्यात येत आहे व याकामी नव्याने स्थापत्य कामासहित अल्प मुदतीचे एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट त्वरीत मागविण्यात यावे. सदरचा ठराव मा.राष्ट्रीय हरीत लवाद यांचे निदर्शनास आणून देण्यात यावा.

सदर बाबत मे.कोर्टाने दिनांक ०८/०८/२०१४ रोजी अंतरीम आदेश दिले यामध्ये महानगरपालिकेने मा.जिल्हाधिकारी यांचे कडेस जमा केलेली रु. ५ लक्ष रक्कम मा.जिल्हाधिकारी यांनी नुकसान भरपाई म्हणुन अर्जदार यांना देणे तसेच महानगरपालिकेने रु.४.५० कोटी रक्कम मा.जिल्हाधिकारी यांचेकडेस चार आठवड्याच्या कालावधीमध्ये जमा करणे. मा.जिल्हाधिकारी यांनी घनकचऱ्यावर प्रक्रिया बाबतचा प्रकल्प उभारणे करीता निविदा मागविणे व प्रकल्प उभारणे तसेच तसेच महानगरपालिकेने कचरा डेपो करीता पर्यायी जागेची व्यवस्था करणे असे आदेश दिले आहेत त्यानुसार कार्यवाही करणे आवश्यक आहे. आदेशाची प्रत सोबत जोडली आहे.

खत प्रकल्प विकसीत करणे व सॅनेटरी लॅण्ड फील साईट करीता मा. १३ व्या केंद्रीय वित्त आयोग अंतर्गत प्राप्त अनुदान, मनपा फंड अथवा इतर प्राप्त होणाऱ्या अनुदानामधुन ४.५० कोटी रक्कम उपलब्ध करणे आवश्यक आहे. याबाबत मा.मुख्यलेखा अधिकारी यांचा अभिप्राय घेणे आवश्यक आहे.

तरी मे.कोर्टाचे दिनांक ०८/०८/२०१४ रोजीचे आदेशानुसार पुढील निर्णय घेणेस्तव प्रस्ताव मा.महासभेकडेस सादर करणे बाबत सविनय सादर.

यावर शहरअभियंता श्री.एन.बी.मगर यांचा अभिप्राय की, अ व ब अहवालाप्रमाणे निर्णय घेणेसाठी सदरचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणे आवश्यक आहे. मान्यतेस सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय अर्थविभाग/मुख्यलेखाधिकारी /२०१४ दिनांक १४/०८/२०१४ अन्वये फेरसादर की,

विषय : अहमदनगर महानगरपालिकेच्या बुरुडगाव स.नं.३४ (पैकी) येथील कचरा डेपोच्या जागेसंदर्भात मा.नॅशनल ग्रीन ट्रीब्युनल, वेस्टर्न झोन बेन्च, पुणे येथे ॲप्लीकेशन नं.९ (टी.एच.सी.) २०१३ (डब्ल्यु.झेड) चे अंतरीम आदेश बाबत..

संदर्भ : अ.नगर महानगरपालिका, प्रकल्प विभाग यांचा दिनांक १४/०८/२०१४ चा रिपोर्ट व शहर अभियंता, मनपा यांचे अभिप्राय.

अहमदनगर महानगरपालिकेस १३ वा वित्त आयोग अंतर्गत सोबत तक्ता नं.१ मध्ये दर्शविल्यानुसार सन २०११-२०१२ ते सन २०१३-२०१४ अखेर एकूण रक्कम रु.३४,१८,४४,६३०/- (रु.चौतीस कोटी अठरा लाख चव्वेचाळीस हजार सहाशे तीस फक्त) इतके अनुदान प्राप्त झालेले आहे. सदर प्राप्त अनुदानातून महासभा ठराव क्रमांक ६९ दिनांक २३/१२/२०१० व जा.क्र.पाणीपुरवठा ७ दिनांक ०२/०४/२०११ अन्वये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान निधीकडे मनपा हिस्स्यापोटी एकूण रक्कम रु.१९,४४,९९,८४४/- (रु.एकोणीस कोटी चव्वेचाळीस लाख नव्व्यान्नव हजार आठशे चव्वेचाळीस फक्त) वर्ग केलेले आहेत.

सोबत तक्ता नं.२ मध्ये नमुद केल्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेस महाराष्ट्र सुवर्णजयंती नगरोत्थान महाअभियान योजने अंतर्गत प्राप्त अनुदान रु.१७,५२,४४,०००/- इतके अनुदान प्राप्त आहे. व मनपा हिस्स्यापोटी एकूण रक्कम रु.२१,७६,८०,२८७/- इतकी जमा केलेली आहे. सद्यस्थितीत प्राप्त अनुदानाइतकी अपेक्षीत असलेली संपुर्ण रक्कम रु.१७,५२,४४,०००/- इतकी होत होती. तथापि मनपाने रु.२१,७६,८०,२८७/- भरुन मनपा हिस्स्यापोटी जादा जमा केलेली रक्कम रु.४,२४,३६,२८९/- (रु.चार कोटी चोवीस लाख छत्तीस हजार दोनशे एकोणनव्वद फक्त) परत १३ व्या वित्त आयोग निधीचे सेव्हींग खात्यात वर्ग करुन सदर रक्कम व रु.४.५० कोटी जमा करणेकरीता उर्वरीत रक्कम रु.२५,६३,७१३/- (रु.पंचवीस लाख त्रेसष्ट हजार सातशे तेरा फक्त) मनपा जनरल फंडाचे विजया बँक सेव्हींग खात्यातून अदा करणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

ज्याअर्थी मनपाची आर्थिक परिस्थिती बिकट आहे. परंतु मा.राष्ट्रीय हरीत लवाद, पश्चीम विभागीय खंडपीठ पुणे यांचे आदेशानुसारन रु.४,५०,००,०००/- (रु.चार कोटी पन्नास लाख फक्त) अदा करणे आवश्यक असल्याने टिप्पणी मध्ये सादर केल्यानुसार रक्कम अदा करणे प्रस्तावित करण्यात येत आहे.

लक्षवेध :- सुलभ संदर्भास्तव सोबतचे तक्ते क्र.१ व २ पहावेत.

**तक्ता क्रमांक - १**

| अ. नं. | सन | प्राप्त निधी | महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान व म.सु.ज.नगरोत्थान जिल्हास्तर निधीकडे मनपा हिस्स्यापोटी वर्ग | विकास कामासाठी झालेला खर्च | म.रा.वि.मंडळ पा.पु.वीज देयक अदा | UIDSSMT केडगांव पा.पु.योजना मनपा हिस्सा जमा | जकातीचे जाम रक्कमेपोटी मनपा जनरल फंडाकडे वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २०११ -१२ | १,३६,५९, १२६ | १,३६, ५९,१२६ | | | | |
| | २०१२ -१३ | ३,१३,६१,५६४<br>१,९९,६०,०४६,<br>५,६५,४५,८४८ | ३,१३, ६१,५६४<br>१,९९,६०,०४६ | | | | ५,६५,४५,८४८ |
| | २०१३ -१४ | १७,८९,४४,८४२<br>४,१३,७३,२०४ | १२,८६,७८,६५१ | ४,७४,३०,०६५<br>२८,३६,१२६ | १,१६,६१,७४७ | १,८९,००,००० | |
| | एकुण | २४,१८,४४,६३० | २०,४४,७०,८४४ | ५,०२,६६,१९१ | १,१६,६१,७४७ | १,८९,००,००० | ५,६५,४५,८४८ |

मनपा हिस्स्यापोटी वर्ग

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान :- १९,४४,९९,८४४/-

म.सु.ज.नगरोत्थान जिल्हास्तर :- ९९,७१,०००/-

एकूण २०,४४,७०,८४४/-

जा.क्र.अर्थ/अनुदान/२०१४

दिनांक - १४/०८/२०१४.

महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियान निधी, शासनाकडून प्राप्त रक्कम, मनपा हिस्सा जमा रक्कम, झालेला खर्च व प्राप्त व्याज इ. गोषवारा सन २०११-२०१२ ते ०७ ऑगस्ट २०१४ अखेर.

**तक्ता क्रमांक - २**

| प्राप्त अनुदान | मनपा हिस्सा वर्ग | प्राप्त व्याज | एकूण जमा | झालेला खर्च | शिल्लक निधी |
|---|---|---|---|---|---|
| ८७६२२०००<br>८७६२२००० | २१७६८०२८७ | ४५८६६४०२ | ४३८७९०६८९ | २६७९४९६२४ | १७०८४१०६५ |
| १७५२४४००० | | | | | |

मनपा हिस्सा जमा रु.२१,७६,८०,२८७/-

मनपा हिस्सा भरणे आवश्यक रु.१७,५२,४४,०००/-

जादा जमा रु. ४,२४,३६,२८७/-

शिल्लक निधी सेव्हींग - रु. १,५५,८३,६६२/-

मुदतठेव पावती कॅश - रु. २,७२,६६,३११/-

गुंतवणूक - रु.१२,७९,९१,०९२/-

एकुण- - रु.१७,०८,४१,०६५/-

यावर उपायुक्त कर श्री.बेहेरे साो यांचा अभिप्राय की, प्रकल्प अभियंता यांनी प्रस्तावित केलेनुसार व मे.नॅशनल ग्रीन ट्रायब्युनल (वेस्ट झोन) पुणे यांचे दि.०८/०८/२०१४ चे आदेशानुसार मा.जिल्हाधिकारी साो यांचेकडेस चार आराखडयानुसार आज रक्कम रु.४.५० कोटी जमा करणेसाठी मुलेअ यांच्या अभिप्रायातील प्रस्तावाचा विचार होवून त्यांचे टिप्पणीतील अ नुसार रक्कम जमा करणे योग्य राहील असे मत आहे.

प्रस्ताव त्यानूसार मे.महासभेपुढे ठेवणे बाबत मे.आदेशार्थ स.सादर.

यावर मा.आयुक्त साो श्री.विजय कुलकर्णी यांचा अभिप्राय की, प्रस्तावित केलेनुसार मान्य.

अशा बाबतचा ऑफिस प्रस्ताव व फेरसादर मा.आयुक्त साहेब, मा.उपायुक्त (कर), मा.मुख्य लेखाधिकारी , मा.शहर अभियंता यांचे अभिप्रायासह मा. महासभेपुढे ठेविला.

-- **--

**चर्चा -**

**मा.श्री.गणेश भोसले -** LBT व फेज -२ संदर्भात आम्ही पत्र दिले आहेत.ते पुढच्या सभेत प्रश्नोत्तराच्या तासात घेण्यात यावेत.

**मा.श्री.सचिन जाधव -** हरीत लवादास कोणत्या कोर्टा चा दर्जा आहे.

**मा.आयुक्त -** नॅशनल ग्रीन ट्रायब्युनल ॲक्ट पारीत झालेला आहे,यानुसार लवादाची स्थापना झ ाली आहे. लवादा चे गुजराथ,गोवा व महाराष्ट्र हे कार्यक्षेत्र आहे.यावर मा.हायकोर्ट न्यायाधिशांच्या दर्जा चे न्यायाधिश आणी प्रदुशण नियंत्रण मंडळाचे सेक्रेटरी असे जॉइंट बेंच कामकाज पहाते.

**मा.सचिन जाधव -** किती तारखेला दंडाचे आदेश दिले.३०/५/१४ला आदेश झाले.त्यानंतर २/६/१४ रोजी स्थायी समितीची बैठक बोलवण्यात आली.त्या कालावधीत हा मुद्दा आमच्या समोर का मांडला नाही. हा जो ५लाख रू.दंड झाला. दि.२/६/१४ रोजीच्या बैठकीमध्ये पुढील तारीखेबाबत आमच्या समोर विषय आला नाही. त्यावर पर्याय शोधता आला असता.

**मा.श्री.मेहेत्रे -** ३०/५/१४ चा निकाल स्थायी समितीच्या निदर्शनास आणला आहे.

**मा.सचिन जाधव -** २/६/२०१४ ला स्थायी समितीसमोर हा विषय आणला नाही. ३०/६/ला सभापतींना पत्र देता. ८/८/१४ ला कोर्टा च्या तारखेच्या दोन दिवस आधी विषय स्थायी समितीच्या समोर आणला. ३०/५/१४ रोजी झालेला निर्णय २/६/१४ रोजी का पाठविला नाही.१ महिना का घालवला.

**मा.आयुक्त -** सन्माननीय सभापतीना ३- ४ वेळा मी ही गोष्ट सांगीतली.या प्रश्नाची ग्रॅव्हीटी तुम्ही समजून घ्या. उपायुक्तांनीही ही बाब मा.सभापतींच्या निदर्शनास आणली आहे.

**मा.महापौर -** २ ते३ वेळा हा विषय स्थायी समिती समोर चर्चेला आला आहे. पहाणीसंदर्भात निर्णय त्यावेळी घेण्यात आला होता.

**मा.आयुक्त -** फक्त डिपॉझीट निर्णय झाला होता,दंड नव्हे.२००६ मध्ये मा.सुप्रीम कोर्टा ने घनकचरा व्यवस्थापन संदर्भात रूल्स पास केले. ४ ते ५ वर्षा पुर्वी बुरूडगाव ग्रामस्थांनी हाय कोर्टा त रीट दाखल केले. दरम्यानच्या काळात रिट हाय कोर्टाने राष्ट्रीय हरीत लवादाकडे वर्ग केले. दरम्यानच्या काळात स्थायी समिती स्थापन नसल्याने माझ्या अधिकार कक्षेत तेथील सुधारणा केल्या.यामध्ये एका ठिकाणी जमा झालेला कचरा jcbच्या सहायाने हटवून एका बाजूला लावून त्यावर पावडर टाकून प्रक्रीया करण्यात आली. ४ ते ५वेळा टेंडर कॉल केले गेले परंतू त्यास प्रतिसाद मिळाला नाही.त्यानंतर

एक्सप्रेशन ऑफ इंटरेस्ट मागविण्यात आले. त्यास एका निविदा धारकाने प्रतिसाद दिला. यापुर्वी डेपोवर १० ते १२ वर्षा पुर्वीचा कचरा साठलेला आहे.

**मा.सचिन जाधव -** २४ व ३० / ६ ला ऑफीस रिपोर्ट मध्ये आहे.मधल्या काळात हा विषय आमच्या समोर का आला नाही.

**मा.उपायुक्त,श्री.बेहेरे -** २/६/१४ रोजी स्थायी समिती समोर घेण्याकरीता जो रिपोर्ट नगरसचिवांकडे पाठविला त्यात तारखेचा उल्लेख आहे.स्थायी समितीतील चर्चा मा.उपायुक्त यांनी वाचून दाखविली. ५लाख रूपये डिपॉझीट जमा करण्यासंदर्भात मी स्थायी समितीला निदर्शनास आणून दिले आहे.

**मा.श्री.सचिन जाधव -** २/६ नंतर नव्याने निवीदा का मागवल्या नाहीत.

**मा.उपायुक्त,श्री.बेहेरे -** २४ व ३०/६ ला स्थायी समितीला सभा घेण्यासंदर्भात तत्कालीन आयुक्त या नात्याने मी स्थायी समितीला पत्र दिले.

**मा.श्री.अनील शिंदे -** निवीदा किती वेळा आल्या.

**मा.उपायुक्त,श्री.बेहेरे -** ६ वेळा निविदा काढण्यात आल्या,एकदाही निविदा प्राप्त झाली नाही.

**मा.श्री.अनील शिंदे -** आयुक्तांना या बाबत निर्णय घेण्याचा अधिकार नाही का.

**मा.आयुक्त -** एखादी निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकार स्थायी समितीला आहे.

**मा.बाळासाहेब बोराटे -** स्थायी समितीने नाकारलेला नाही. उपायुक्त बेहेरे साहेबांनी बार्शी येथे तेथील मुख्याधिका-यांशी फोन व्दारे चर्चा करून तेथील कामाबाबत माहिती घेतली असता तेथे कोणतेही काम झालेले नाही. याबाबत माहिती दिली.

**मा.श्री.सचिन जाधव -** बेद्रे ऐवजी लोखंडे यांची नेमणूक अचानक करण्यात आली.ज्युनियर लॉयर श्री.लोखंडे यांना कोर्टा पुढे उभे करण्यात आले. या विषयाची सखोल माहिती त्यांना नसल्याने महापालिकेची बाजू सक्षमपणे मांडता आली नाही. या केस साठी सक्षम लॉयरची नेमणूक करण्यात यावी.

**मा.श्री.अनील शिंदे -** १३ व्या वित्त आयोगातून रक्कम वर्ग केली का.

**मा.सौ.ठाणगे -** महानगरपालिकेने एकटयाने एवढा खर्च करणे शक्य नाही. पुढील कोर्टात अपील करण्यात यावे.

**मा.श्री.बाळासाहेब बोराटे -** मा.ठाणगे ताईंनी जे मुद्दे मांडले त्याचाही विचार व्हावा.कोर्टा चा अवमान होउ नये असे आमचे मत आहे.

**मा.आयुक्त -** श्री.लोखंडे हे देखील सिनीयर ॲडव्होकेट आहेत.स्थायी समितीने बेद्रे यांना हटवून लोखंडे यांना घेण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये ४ आठवडयांची मुदत आहे. ती ५/८/रोजी संपत आहे.

**मा.श्री.दीप चव्हाण -** ३०/५,८/६/ ,शेवटची स्थायी समिती त्यानंतर डिस्ट्रीक्टचे वकील लोखंडे,पत्रकार एवढयांच्या साक्षीने सर्व विषय झालेले आहेत. ही विषयांची सुरवात नवीन नाही.घनकचरा अंतर्गत छोटा हत्ती आले.त्याची रक्कम खर्च झाली. बुरूडगाव मधील एका फिर्यादीने तक्रार दाखल केल्यानंतर याची ग्रॅव्हीटी वाढली.स्थायी समिती समोर एकच टेंडर आल्यानंतर त्यावर चर्चा झाली. १२५ मे.ट.चा आपला प्रकल्प असल्याने कामाचा अनुभव पहाण्यासाठी बार्शीला

जाण्यासाठी आम्ही निघालो. परंतू तेथे काम चालू नसल्याची माहिती मिळाली. दरम्यान प्रशासनाच्या वतीने शहर अभियंता श्री.मगर साहेब व श्री.मेहेत्रे साहेब तो प्रोजेक्ट पाहून आले. तुम्ही स्थायी समिती समोर काय म्हणाले तुम्ही जाउन या. बाळासाहेब बोराटे म्हणाले मी स्वत: गाडी घेतो.आपण जाउन येउ.तेंव्हा ठेकेदार याने ट्रायल बेसीसवर तेथे वर काम चालू असल्याचे ठेकेदाराने सांगीतले.त्यानंतर श्रीवर्धन येथे प्रोजेक्ट चालू असल्याने तेथे पहाणीसाठी जाण्याचे ठरले. परंतू नंतर त्यानेच श्रीवर्धन येथे प्रकल्प चालू नसल्याचे सांगीतले.त्यामुळे तेथे जाणे झाले नाही. स्थायी समिती समोर ऑफीसने ठरवलेली रक्कम ३११ चा रेट होता २०५ व २१५ या रेटने मला परवडेल असे ठेकेदाराने सांगीतले. ऑफीस रिपोर्टच्या खाली आम्ही जाउ शकत नाही. त्यानंतर टेंडर थांबले. मा.हाय कोर्टाची जी तारीख होती,जे मुद्दे कोर्टा समोर मांडायला पाहीजे त्याठिकाणी बेद्रे वकीलांची नेमणूक अचानक काढण्यात आली.आता तीसरा मुद्दा सुप्रीम कोर्टा तील अपीलाबाबत आहे.यापुर्वी सुप्रीम कोर्टा ने १५ वर्षा पुर्वीच घनकचरा व्यवस्थापन संदर्भात करावयाच्या कार्यवाही बाबत निर्देश दिले आहेत. ट्रायब्युनल कोर्टा च्या संदर्भात जर अवमान झाला तर सभागृह अडचणीत येउ शकते.सभागृहाला अडचणीत आणू नका.२५ लाखाच्या पुढचा विषय असल्याने कुठल्या फंडातून पैसे वर्ग करायचे यासाठी हा विषय घेतला आहे.आम्हाला कायद्याच्या चौकटीने बांधले आहे.महापौर यांची जबाबदारी येत नाही. सभागृहाची जबाबदारी येत नाही.स्थायी समिती समोर एक प्रोसेस व कनक्लूजन ठेवले होते. घन कच-या अंतर्गत लेखाशिर्षा मध्ये ऑलरेडी तरतूद करण्यात आली आहे.हायकोर्टा चा अवमान कोणालाही करता येणार नाही.सुप्रीम कोर्टा त जाण्यासाठी आपल्याला ग्राउंड काय आहे? यापुर्वी २ प्रोसेस विदाउट जनरल बोर्डाच्या मंजूरीने केल्या आहेतच. यात स्थायी समितीचा कोणीही जबाबदार नाही. येथे असणा-या ठेकेदाराला कामाचा अनुभव नाही.अद्यावत मशीनरी त्याच्याकडे नव्हती. तो काम करण्यास सक्षम नव्हता.त्यामुळे त्याने काम करण्यास नकार दिला. उद्या जर बेकायदेशीर मंजूरी दिली असती तर त्याला स्थायी समिती जबाबदार ठरली असती. एम.आर.ट्रेड संदर्भात विभागीय आयुक्त यांचेकडे ५० लाख रूपये भरण्यासंदर्भात ना. हायकोर्टा चा निर्णय झाला असताना तो निर्णय सभागृहासमोर आणला नाही व त्यावर कार्यवाही झाली.तेव्हा मे.कोर्टा चे निर्णय असे सभागृहासमोर आणू नयेत. मे.कोर्टा च्या आदेशानुसार पैसे कशातून भरायचे याचा सर्वांचे मत विचारात घेउन कोर्टाचा अवमान होणार नाही या दृष्टिने निर्णय घ्यावा.

**मा.श्री.अभय आगरकर -** आपल्याला आज फक्त पर्याय काय आहे हा विषय समोर आहे. ठरावीक कालवधीत रक्कम भरण्याचा पर्याय आपल्यासमोर आहे. आज एखाद्या एजन्सीला बोलावून काम करण्यासंदर्भात निर्णय आपण घेउ शकत नाही. बजेट प्रोव्हीजन करताना येणा-या योजनांचा अंतर्भाव आपण करू शकतो परंतू ते जो पर्यंत रिसीव्हेबल होत नाही तोपर्यंत आपण करू शकत नाही.परंतू याठिकाणी प्रॉपर डिसीजन घेणे अभिप्रेत आहे.महानगरपालिकेची आर्थीक स्थिती आज ४.५ कोटी भरण्याची नाही हे वास्तव आहे.मग याला असणारा पर्याय सुचवावा. शासनाच्या इतर असणा-या निधीतून १३ व्या वित्त आयोगातून खर्च अनुज्ञेय आहे.आपणाला ही शेवटची संधी आहे.महाराष्ट्र शासनाचे सचिव व आयुक्त यांनी ॲफेडेव्हीट मे. कोर्टात दिले आहे. सभागृहाची जबाबदारी निश्चीत होउ शकते. व्यवहार व कृती यांचा मेळ घालणे आवश्यक आहे. विनाकारण कन्टेम्प्ट ऑफ कोर्ट होउ

शकते. महानगरपालिका फंडाची स्थिती तशी नाही म्हणून १३ व्या वित्त आयोगातून हा खर्च करण्यात यावा.

**मा.श्री.अनील शिंदे -** १३ व्या वित्त आयोगातून हा निधी खर्च करू शकतो हे आगरकर साहेबांनी निवेदन केले त्यानुसार १३ व्या वित्त आयोगातून निधी खर्च करण्यात यावा.

**मा.श्री.दीप चव्हाण -** १७ कोटी ५०लाख शासनाकडून प्राप्त झाले आहेत.एकूण २१ कोटी नगरोत्थान साठी शासनाकडून प्राप्त झाले आहे.नगरोत्थानला पाठविलेले २१ कोटी पुन्हा १३ व्या वित्त आयोगाकडे वर्ग करावे लागाणार आहेत.

**मा.आयुक्त -** या आठवडयात १३ व्या वित्त आयोगाची नव्याने ग्रँट मिळणार आहे.

**मा.दीप चव्हाण -** पारगमन बंद झालेला आहे.पारगमनची पुढच्या सहा महिन्याची रक्कम कमी होणार आहे.LBT ची अपेक्षीत वसूली झालेली नाही.पालिका फंडातून रक्कम रेक्टीफाय केल्यास आम्हालाही निधी मिळेल की नाही याची शाश्वती नाही. चालू बजेट २५ ते ३० टक्के रिव्हर्स येणार आहे.पालिकाफंडातून हे पैसे जमा करणे शक्य नाही. त्यामुळे १३ व्या वित्त आयोगा व्यतिरिक्त काही पर्याय असल्यास ते सांगावे.

**मा.संजय घुले -** मा.महापौर साहेब,वित्त आयोगाच्या निधीतून रकमेची तरतूद करावी.मात्र विकास कामांसाठी पैसा उपलब्ध होणे आवश्यक आहे.याकरीता प्रशासनाने महानगरपालिकेचे उत्पन्न बाजू सक्षम करावी.

**मा.बाळासाहेब बोराटे -** कलेक्टर साहेबांकडून ही टेंडरची प्रक्रीया होणार असल्याने टेंडर मध्ये वीज निर्मीती करण्याची अट टाकण्यात यावी.

**मा.अनील शिंदे -** खत प्रकल्पाचा जसा विषय आला तसा कचरा संकलनचा विषय पुढील सभे समोर घेण्यात यावा.

**मा.समद खान -** शासनाच्या वित्तआयोगातून रक्कम द्यावी.

**मा.महापौर -** राष्ट्रीय हरीत लवाद यांचे आदेशाप्रमाणे मा.जिल्हाधिकारी यांचेकडे भरावयाची रक्कम रू.४ कोटी ५०लाख भरणेबाबत मुदतीमध्ये कार्यवाही करावी. सदरची रक्कम ऑफीस रिपोर्ट नुसार १३ व्या वित्त आयोगाच्या प्राप्त अनुदानातून व उर्वरीत रक्कम महानगरपालिका फंडातून भरावी.

---**---

**ठराव :-**

ऑफीस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार राष्ट्रीय हरीत लवाद (पश्चिम झोन),पुणे यांचे दि.८/८/२०१४ चे आदेशानुसार सर्वे नं.३४(पैकी)मौजे बुरूडगाव येथील महानगरपालिकेच्या जागेवर खत प्रकल्प व सॅनेटरी लॅण्डफील साईट विकसीत करणे करीता १३ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशी अंतर्गत प्राप्त अनुदानातून रक्कम रू. ४,२४,३६,२८७/- (चार कोटी चोवीस लाख छत्तीस हजार दोनशे सत्याऐंशी फक्त) तसेच रक्कम रू.२५,६३,७१३/- महानगरपालिकेच्या जनरल फंडामधून यासह एकूण रक्कम रू.४,५०,००,०००/-(चार कोटी पन्नास लक्ष फक्त) मा.जिल्हाधिकारी ,अहमदनगर यांचेकडे मुदतीत जमा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

तथापी महानगरपालिका प्रशासनाने दोन महिन्यांच्या आत रक्कम रूपये ४ कोटी ५०लक्ष एवढा निधी महानगरपालिकेच्या विविध उत्पन्नाच्या स्त्रोतांच्या माध्यमातून महानगरपालिकेच्या विकास कामांसाठी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टिने कार्यवाही करावी. या निर्णयास ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार कार्यवाही करावी.

सूचक - मा.श्री.बाळासाहेब बोराटे

अनुमोदक- मा.समद खान

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक :- १८ (१)** **दिनांक : ०३ / ०९ /२०१४.**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेतील कर्मचा-यांच्या रुपये एक लाखापेक्षा जास्त वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपुर्ती देयका बाबत. (श्री.सुरेश कोंडीबा इथापे)

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंती रिपोर्ट सादर करण्यात येतो कि, मा.महाराष्ट्र शासन,सार्वजनीक, आरोग्य विभाग,शासन निर्णय क्र.एम एजी २००५/९/ प्र.क्रं.१, आरोग्य ३,मंत्रालय,मुंबई दि.१९ मार्च २००५ अन्वये शासकीय कर्मचा-यांनी व त्यांच्या कुटूंबीयांनी आकस्मिक शासकीय निकडीच्या प्रसंगी घेतलेल्या खाजगी रूग्णालयातील अंतंररूग्ण उपचाराच्या वैदयकिय खर्चाच्या प्रतिपूर्ती मंजूर करण्यांत आलेली आहे.

त्या अनुषंगाने अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैदयकीय खर्चाची प्रतिपुर्ती योजना लागु करण्यांस मा.महासभा ठराव क्रमांक २ दि.३/११/२००७ अन्वये ठराव पारित करण्यांत आलेला आहे.त्यानुसार जा.क्र.आस्था.३५१ दि.२९/४/२००८अन्वये कार्यालयीन परिपत्रकानुसार कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतीपुर्ती योजना दि.१/४/२००८ पासुन लागू करण्यांत आलेली आहे.

तदनंतर मा. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग क्रमांक वैखप्र २०११/ प्र.क्र.३३३ /११/राकवि२,मंत्रालय,मुंबई दिनांक १६ नोव्हेंबर २०११ अन्वये दिनांक १९ मार्च २००५ चे शासन निर्णयात बदल करून प्रतिपुर्तीच्या अनुज्ञेयतेची कमाल मर्यादा रू.४००००/- वरून रू.१०००००/- पर्यत वाढविण्यात आलेली असून सदर प्रतिपुर्तीस मंजुरीचे अधिकार संबंधीत विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत व रू.१०००००/- पेक्षा जास्त वैदयकिय खर्चाच्या प्रतिपुर्तीचे प्रकरणांना महाराष्ट्र राज्य सेवा (वैदयकिय देखभाल)नियम १९६१ व त्यानंतर वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेल्या शासन निर्णयामधील तरतुदीच्या अधिन राहुन मंजुरी देण्याचे अथवा उचित निर्णय घेण्याचे पुर्ण अधिकार संबंधीत मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमुखांना देण्यात आलेले आहेत.

सदरचे शासन निर्णयानुसार महापालिकेमध्ये कायम कर्मचा-यांचे रू.१०००००/- पर्यतचे व १०००००/-पेक्षा जास्त वैदयकिय खर्चाचे परतावा देयक मंजुर करणे बाबतचा प्रस्ताव मा.महासभा,अहमदनगर महानगरपालिका यांचे समोर मान्यते करीता सादर करण्यात आला असता मा.महासभेने दिनांक २६/५/२०१२ रोजी खालील प्रमाणे ठराव पारित केलेला आहे.

" ऑफिस रिपोर्ट व सभागृहातील चर्चा पहाता रक्कम रू.एक लाखापर्यत कायम कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती देणे बाबत मा.आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांनी कार्यवाही करावी तसेच रक्कम रूपये एक लाखापेक्षा जास्त वैदयकिय खर्चाच्या प्रतिपुर्ती देणे बाबत ऑफिस रिपोर्ट मध्ये नमुद असलेल्या कर्मचा-यांची वैदयकिय प्रतिपुर्ती यादी बाबत कार्यवाही करणेस मंजूरी देण्यात येत आहे.तसेच असे देखील ठरविण्यात येते की, एक लाख रकमेच्या पुढील कर्मचा-याच्या आरोग्य प्रतिपुर्ती बाबत प्रकरण तपासुन मा.आयुक्त, यांनी महासभेच्या मंजुरीसाठी ठेवण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.नियमानुसार पुढील उचित कार्यवाही करावी."

त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेमधील कर्मचा-यांना वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती देयके संबंधीत विभाग प्रमुख यांचे मार्फत सादर केलेली आहेत. सदरची देयके मुख्य वैदयकिय अधिकारी कै.बा.दे. दवाखाना,यांनी सदरच्या देयकामधील आजाराची पडताळणी केलेली असुन संबंधीत आजार शासन विर्निदिष्ठ यादीत समाविष्ट आहेत असे कळविले आहे.परंतु सदरच्या कर्मचा-यांनी दाखल केलेली बिले हे शासनाने ठरवून दिलेल्या दवाखान्या व्यतिरीक्त आहे असे कळविले आहे.

वैदयकिय खर्चाची प्रतिपुर्ती योजना देयके अदा करणेसाठी सन२०१३-१४ या वर्षामध्ये रू.४०,००,०००/- (चाळीस लाख) इतकी तरतुद केलेली आहे.सदर योजने अंतर्गत खालील तक्त्यातील कर्मचा-यांनी वैदयकिय खर्च परतावा देयक सादर केलेली असुन त्याची एकूण रक्कम रू.१,५७,४७७/- इतकी होत आहे.

| अ.क्र. | कर्मचा-यांची नाव | हुददा | रूग्णाचे नांव व कर्मचा-याशी नाते | मा.शासन निर्णयातील आजार क्र | आजाराचे स्वरूप | मागणी रक्कम | देय रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | श्री.सुरेश कोंडीबा इथापे | ड्राप्समन | स्वतः | १९ | ब्रेन ट्युमर | १,७४,९७५ | १,५७,४७७ |
| | | | | | | **एकुण** | **१,५७,४७७** |

मा.शासनाचे दिनांक १६ नोव्हेंबर २०११ चे शासन निर्णयानुसार रूपये १००००० पर्यतचे वैदयकिय खर्च परतावा देयके मंजूर करणेचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभाग प्रमंखांना देण्यात आलेले आहे.सदर बाबत रू.१लाखचे पुढील वैदयकिय परतावा देयके मंजूर करणेबाबतचा प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करण्यात आला होता.त्यानुसार मा.महासभेच्या दिनांक २६/५/२०१२ रोजीच्या ठरावानुसार रू.१लाखाचे पुढील वैदयकिय खर्चाचे प्रतिपुर्ती देणे बाबत मा.महासभेमार्फत अदा करणे बाबत ठराव मंजूर झालेला आहे.

